दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -२६ | गुरूवार, दि.०२ ऑक्टोबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-26 | Thursday, Dt.02 October 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# नगरपरिषद निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी २८ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार

## निवडणूक आयोगाचा कार्यक्रम जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

**राज्यातील २४७ नगरपरिषदा आणि ४२ नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने बुधवार दि. १ ऑक्टोबर रोजी मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार नगरपरिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीसाठी प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी २८ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहीर केली जाणार आहे.**

निवडणूक आयोगाने घोषित केल्यानुसार प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी ८ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असून त्यावर १३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत हरकती आणि सूचना दाखल करता येतील. राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित केला असून त्या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहे. प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करताना विधानसभा मतदारसंघाच्या यादीप्रमाणेच मतदार याद्यांमध्ये मतदारांची नावे आणि पत्ते कायम ठेवले जातात.

या याद्यांमध्ये नवीन नावांचा समावेश करणे, नावे वगळणे अथवा नावे किंवा पत्त्यांमध्ये दुरूस्ती करणे इत्यादी स्वरूपाची कारवाई राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. मतदार याद्यांचे विभाजन करताना लेखनिकांकडून होणा-या चुका, मतदाराचा चुकून प्रभाग बदलणे, विधानसभेच्या यादीत नाव असूनही प्रभागाच्या यादीत नाव नसणे आदींसंदर्भातील दुरूस्त्या याबाबत हरकती आणि सूचना मतदार दाखल करू शकतात.

### जि. प. आणि पं. स. निवडणुकांसाठी १३ ऑक्टोबरला आरक्षण सोडत

राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या ३३६ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी १३ ऑक्टोबर २०२५ रोजी आरक्षण सोडत काढण्यात येणार असल्याची घोषणा राज्य निवडणूक आयोगाने केली आहे. संबंधित जिल्हाधिकारी १० ऑक्टोबर २०२५ रोजी वृत्तपत्रात आरक्षण सोडतीसंदर्भातील सूचना प्रसिद्ध करतील. १३ क्टोबर २०२५ रोजी सोडत काढल्यानंतर प्रारूप आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल. त्यावर १४ ते १७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत हरकती आणि सूचना दाखल करता येतील. प्राप्त हरकती आणि सूचनांचा विचार करून ३ नोव्हेंबर २०२५ रोजी शासन राजपत्रात अंतिम आरक्षण प्रसिद्ध केले जाईल.

### निवडणुकीसाठी १० कोटीचा निधी

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका पार पाडण्यासाठी संबंधित जिल्हाधिका-यांना १० कोटी ८ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. ग्रामविकास विभागाने बुधवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला.

# श्रीक्षेत्र शृंगेरी देवीच्या आरतीचा मान आष्टीतील पत्रकारांना

## आराध्य दैवत शृंगेरी देवी देवस्थानच्या शारदीय नवरात्र उत्सवाला भाविकांची प्रचंड गर्दी



**प्रतिनिधी @ आष्टी**

आष्टी, पाटोदा, जामखेड सह बीड आणि अहिल्यानगर जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या श्रीक्षेत्र श्रंगेरी देवी देवस्थानच्या शारदीय नवरात्र उत्सवाला भाविकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असून हजारो भाविकांनी देवीच्या दर्शनासाठी गर्दी केली असून विनम्रपणे नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले आहेत. दरम्यान, आज मंगळवारी दुपारी देवीच्या या आरतीचा मान आष्टी येथील लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हटल्या जाणाऱ्या पत्रकार बांधवांना देऊन देवस्थान मंदिर प्रशासनाने एक वेगळेपणा जपला आहे.

देवीचे हे मंदिर डोंगराच्या उंच माथ्यावर कित्येक वर्षांनी वसलेले आहे. गेल्या अनेक वर्षापासून भाविक भक्त येथे आपल्या मनोकामना पूर्ण व्हाव्यात. या भावनेने दर्शन घेऊन मनोमन प्रसन्न होतात. यंदाही अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असतानाही आणि सर्वसामान्य भाविक भक्त पूर परिस्थितीमुळे संकटात असतानाही या संकटातून मुक्ती मिळण्यासाठी भोळाभाबडा भाविक भक्त शेतकरी, शेतमजूर मुद्दामहून दर्शनासाठी येऊन नतमस्तक झाला. आष्टी तालुक्यातील ब्रम्हगाव येथील ग्रामदैवत असलेल्या आराध्यदैवत श्री क्षेत्र श्रृंगेरीदेवी देवस्थानच्या शारदीय नवरात्र उत्सवानिमित्ताने मंगळवारी आष्टी तालुका पत्रकार संघाला आरतीचा मान देण्यात आला. यावेळी पत्रकार संघाचे जेष्ठ मार्गदर्शक प्रफुल्लभाऊ सहस्त्रबुद्धे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे, पत्रकार सचिन रानडे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. नवरात्रीच्या या धार्मिक सोहळ्यास यावेळी ह. भ. प. ब्रम्हचैतन्य तावरे महाराज, सरपंच रोहिदास पवार, ट्रस्ट अध्यक्ष फौजी विजय हराळ, पुजारी मारुती सानप, भाऊसाहेब पवार, मुख्याध्यापिका सविता माने, शिंदे मडम, राम हराळ आप्पा आदीसह ग्रामस्थ, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आष्टी तालुका पत्रकार संघामधील ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्लभाऊ सहस्त्रबुद्धे यांचा वाढदिवस विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या शुभेच्छांनी साजरा झाला. हे औचित्य साधत शृंगेरी देवीच्या प्रशासनाच्या वतीने आणि पत्रकार बांधवांच्या आणि भाविक भक्तांच्या उपस्थितीत त्यांना शृंगीदेवीच्या पवित्र भूमीत निरोगी, आनंदी, दीर्घ आयुष्यासाठी प्रार्थना करण्यात आली.



# तलवाडा पावन दत्त मंदिर जवळील मुख्य रस्त्यावरील मोठा खड्डा एखाद्याचा जीव गेल्यावर बुजवणार का?

तलवाडा: गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तलवाडा गावात जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर पावन दत्त मंदिर जवळ रोड च्या मध्ये मोठा खड्डा पडला असल्याने वाहन धारकांना जीवघेणा प्रवास करावा लागत असून याकडे सार्जनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांनी बघितलेच नाही परंतु स्थानिक प्रशासन देखील डोळेझाक करत असल्याची भूमिका घेत आहे.त्यामुळे याठिकाणी एखादा मोठा अपघात घडून एखाद्याचा जीव गेल्यावर हा खड्डा बुजणार का असा सवाल तलवाडा व परिसरातील नागरिक करत आहेत.अतिवृष्टी झाल्या नंतर गाव तलावातून सांडव्याद्वारे पाणी वाहत होते तेव्हा हा खड्डा पाण्यामुळे दिसून येत नव्हता त्या वेळी अनेक वाहन धारक या खड्ड्यामध्ये पडले असून आता पाणी नाही तर याठिकाणी सुजान नागरिकांनी अपघात होऊ नये म्हणून झाडांच्या फांद्या टाकल्या आहेत.आता तरी अधिकारी आणि पदाधिकारी यांना जाग येईल का हे पहावे लागेल

# राज्यातील दुकानं, हॉटेल्स २४ तास खुली राहणार, राज्य सरकारचा मोठा निर्णय; बार आणि हुक्का पार्लरचे काय?

मुंबई : राज्यातील व्यापारी आणि ग्राहकांसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यात आता दुकाने, हॉटेल्स आणि इतर आस्थापना २४ तास उघडी ठेवता येणार आहेत. महाराष्ट्र सरकारच्या उद्योग विभागाकडून यासंबंधित शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.



मद्यपान गृहे, बार, परमिट रूम, हुक्का पार्लर, देशी बार यांसारख्या आस्थापनांना वगळता इतर सर्व आस्थापना, खाद्यगृहं आणि दुकाने आता २४ तास सुरू राहणार आहेत. या निर्णयामुळे राज्यातील व्यापारी व्यवहारांना नवे बळ मिळणार आहे आणि ग्राहकांना दिवस-रात्र सेवा उपलब्ध होणार आहे.

कर्मचारी हक्क आणि सुट्टी

'महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियम) अधिनियम, २०१७' च्या कलम १६ (१) (ख) नुसार, कोणतीही आस्थापना आठवड्यातील सर्व दिवस सुरू ठेवता येईल. मात्र, प्रत्येक कर्मचाऱ्यास आठवड्यातून एकदा सलग २४ तासांची साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक राहील. तसेच कलम २ (२) मध्ये 'दिवस' (ऊ) याची व्याख्या मध्यरात्रीपासून सुरू होणारा २४ तासांचा कालावधी अशी करण्यात आली आहे.

शासनाचे अधिकार आणि अधिसूचना

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियम) अधिनियम, कलम ११ नुसार, राज्य सरकारला विविध क्षेत्रांसाठी किंवा आस्थापनांच्या वेगवेगळ्या वर्गांसाठी सुरू आणि बंद करण्याच्या वेळा निश्चित करण्याचा अधिकार आहे. शासनाने १९ डिसेंबर २०१७ रोजी काढलेल्या अधिसूचनेनुसार, परमिट रूम, बिअर बार, डान्सबार, हुक्का पार्लर, डिस्कोथेक, तसेच वाईन आणि मद्य विक्री करणाऱ्या दुकाने यांच्याच वेळा निश्चित करण्यात आल्या आहेत. नंतर ३१ जुलै २०१९ रोजी थिएटर आणि सिनेमा गृहांना या यादीतून वगळण्यात आले.

स्थानिक प्रशासनाची अडचण

स्थानिक प्रशासन आणि पोलिसांकडून अनेकदा मद्य विक्री न करणाऱ्या आस्थापनांवर २४ तास सुरू ठेवण्यास निर्बंध लावल्याच्या तक्रारी सरकारकडे आल्या होत्या. शासनाने स्पष्ट निर्देश दिले आहेत की, मद्य विक्री आणि पुरवठा करणाऱ्या आस्थापनांना सोडून इतर सर्व आस्थापना कायद्यानुसार २४ तास सुरू ठेवता येतील.

# गूढ आवाजाने गेवराई हादरले

गेवराई : ( प्रतिनिधी ) उमापूर ता.गेवराई जि.बीड परीसरात भूगर्भातून मोठा आवाज झाल्याने, नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, अचानक झालेल्या आवाजाचे रहस्य काय ? असा प्रश्न नागरीकांनी उपस्थित केला आहे. मंगळवार ता. ३० रोजी दु. एक वाजता मुंगी ता. पैठण च्या दिशेने आवाज झाल्याचे समजते. दरम्यान, गूढ आवाजाने उमापूरचा परिसर हादरला असून, मोठा आवाज होताच, घरावरची पत्रे हादरली. हा आवाज दूरवर ऐकू गेला आहे. आपल्याच घराच्या मागे आवाज झाल्याचा भास झाल्याचे नागरिकांनी सांगितले आहे.सोशल माध्यमांवर गूढ आवाजाची विचारणा केली. अनेकांनी आवाज झाल्याचे मान्य केले. आता, हा आवाज नेमका कशाचा ? अशी विचारणा करण्यात येत होती. मात्र, गूढ आवाजाचे रहस्य काय, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. सदरील आवाजाने नागरिकांमध्ये भिती व्यक्त करण्यात आली आहे.

# भूमी अधिग्रहणाच्या लढवय्या नेत्या वृंदा कारात परळीत

## माजी खासदार गंगाधरअप्पा बुरांडे व्याख्यानमालेस लावणार उपस्थिती

**प्रतिनिधी @ परळी**

बेकायदा जबरदस्ती भूमी अधिग्रहणाबाबत आवाज़ उठविणाऱ्या तसेच दिल्ली झोपडपट्टी धारकांचा हक्कांच्या घरासाठी यशस्वी लढा देऊन त्याना हक्काचा निवारा मिळवून देणाऱ्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या माजी खासदार तथा राष्ट्रीय नेत्या कॉ.वृंदा कारात हे शुक्रवार दि ३ रोजी परळीत येत असून स्वातंत्र्यसेनानी तथा जिल्ह्याचे माजी खासदार कॉ.गंगाधरअप्पा बुरांडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित व्याख्यानमालेस त्या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी, महाराष्ट्रातील डाव्या चळवळीचे प्रमुख शिलेदार व बीड ज़िल्ह्याचे माजी खासदार कॉ.गंगाधरअप्पा बुरांडे यांनी आपली सबंध हयात तत्त्वनिष्ठा, त्याग, सदाचार व सेवाभाव ही जीवनमूल्य जपत कष्टकरी, शोषित वंचित जीवांच्या उत्कर्षासाठी घालवली. तोच वारसा जपत काळाची पावले ओळखून कॉ.गंगाधरअप्पा बुरांडे स्मृतिप्रतिष्ठान शैक्षणिक कार्यासोबतच शेती, माती, पाणी, माणूस केंद्रस्थानी मानून शाश्वत विकासाच्या वाटेवर मार्गक्रमण करत आहे. शेतकरी शेतमजूर, दीनदलीत, शोषीत वंचीत समाजातल्या शेवटच्या स्तरातील सर्वहारा वर्गाचा लढा लढत आहे. कॉ. अप्पांच्या स्मृतिदिनानिमित्त दरवर्षी विविध क्षेत्रातील प्रतिभावंत व्यक्तिमत्त्वांचे व्याख्याने आयोजित करण्यात येतात.कॉ.गंगाधरअप्पा बुरांडे यांच्या सतराव्या समृतिदिना निमित्ताने शुक्रवार दि ३ रोजी तालुक्यातील मोहा येथे आयोजित स्मृती व्याख्यानमालेस या वर्षी एक संवेदनशील व सोज्वळ व्यक्तीमत्व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या राष्ट्रीय नेत्या ज्यांनी बेकायदा जबरदस्ती भूमी अधिग्रहणाबाबत आवाज उठवला व दिल्ली झोपडपट्टी धारकांचा हक्कांच्या घरासाठी यशस्वी लढा लढला असे माजी खा.कॉ.वृंदा कारात या प्रमुक व्याख्याता म्हणून



उपस्थित असणार आहेत तसेच या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून अखिल भारतीय किसान सभेचे राज्य अध्यक्ष कॉ.उमेश देशमुख यांनीही प्रमुख उपस्थिती असणार आहे.

कॉ.गंगाधरअप्पा बुरांडे यांचा स्मृतीदिनानिमित्त आयोजित या स्मृती व्याख्यानमालेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कॉ. गंगाधरअप्पा बुरांडे स्मृती प्रतिष्ठाण अंबाजोगाई, महाराष्ट्र शिक्षण संस्था व समस्त ग्रामस्थ मोहा, ता. परळी वै. यांनी केले आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय

# नुसता पोरखेळ

'आशिया कप क्रिकेट'चे सामने संपले, विजेता ठरला, तरी अजून त्यातल्या भारत आणि पाकिस्तानमधल्या सामन्यांच्या चर्चा सुरूच आहेत. सर्वाधिक चर्चा आहे, ती स्पर्धा निर्विवाद जिंकूनही भारताला न मिळालेल्या स्मृतिचषकाची. जो स्मृतिचषक या स्पर्धेचं अभिमान चिन्ह होता, ते चिन्ह विजेत्या संघाला न देताच संयोजक चिन्ह घेऊन पळून गेले! आतापर्यंत कोणत्याच आंतरराष्ट्रीय स्पर्धेची अशी नाचक्की झाली नसेल. क्रिकेट जगतात तर नाहीच नाही. क्रिकेट हा खरा 'साहेबा'चा खेळ. तो अत्यंत सभ्य मानला जातो. निदान 'साहेबा'चा प्रभाव होता, तोपर्यंत तरी त्या खेळाचा आब आणि डौल तसाच दाखवला जात असे. पण, 'साहेबा'नेच या खेळाची देणगी त्यांच्या साम्राज्याच्या वसाहतींना दिली आणि जेव्हां तेच 'साहेबा'पेक्षा हा खेळ भारी खेळू लागले, खेळाचं अर्थकारण युरोपमधून आशिया खंडात सरकलं, तेव्हां या खेळाचं रूप बदललं, काही नियमही बदलले. मनगटाच्या नजाकतीने खेळायचा हा खेळ दंडातल्या ताकदीने खेळला जाऊ लागला. जसं खेळाचे तंत्र बदललं, तसा खेळाकडे बघण्याचा दृष्टिकोनही बदलला. मैदानातली खेळाडूंची देहबोली, भाषा आणि डावपेचही अधिक रांगडे होत गेले.

आताच्या 'आशिया कप'च्या बक्षीस समारंभाने तर हेही दाखवून दिलं, की परिपक्क हातातून हा खेळ आता अपरिपक्क हातांमध्ये गेला आहे. क्रिकेट हे आता राष्ट्रवादाचं हत्यार झालं आहे. मैदानाबाहेरच्या राजकारण्यांनी खेळाची सूत्रं आपल्या हाती घेतल्याने क्रिकेट हा आता 'चेंडू-फळी'चा खेळ राहिलेला नाही. तो आता त्या त्या देशाच्या राजकारणाचा भाग झाला आहे. पाकिस्तानसारख्या अर्धवट, अतिरेकी देशातले राजकारणी खेळातही तीच वृत्ती दाखवतात. त्याने या प्रतिष्ठित खेळाचं हसं होणार. विजेत्या संघाला ज्याच्या हातून चषक द्यायचा आहे, तो पाहुणाच चषक घेऊन पळाला, अशी घटना जगातल्या कुठल्याही देशातल्या लहानातल्या लहान गावातल्या छोट्याशा स्पर्धेतही कधी घडली नसेल. पण, अशी घटना आंतरराष्ट्रीय पातळीवर घडली आणि ज्याने हा चषक नेला, तो आजही तो बऱ्या बोलाने द्यायला तयार नाही, ही हद्द आहे! पाकिस्तानच्या गृहमंत्र्यांनी आपल्या देशाची खेळाच्या मैदानातली इभ्रतही या एका घटनेने धुळीला मिळवली आहे.

आशिया खंडातला सध्याचा भूराजकीय तणाव जगजाहीर आहे. किंबहुना या तणावासाठी या खंडाबाहेरूनच बऱ्याच हालचाली सुरू आहेत. अशात 'आशिया चषक स्पर्धा' आयोजित करणं हेच मोठं धाडस होतं. पण, क्रिकेटचं अर्थकारण असं धाडस करण्यास सगळ्यांनाच उद्युक्त करत असतं. त्यात कोणा एकाचा अपवाद असू शकत नाही. ज्या स्पर्धेत पाकिस्तानचा संघ आहे, त्याच्याशी सामना खेळायची वेळ येणारच आहे, तर अशा स्पर्धेत भारताने भाग घ्यावा की नाही, यावरून आधी बराच काथ्याकूट झाला. पण, अखेर संयोजकांची ताकद, त्या स्पर्धेत गुंतलेले मोठे हितसंबंध यामुळे भारताला खेळण्याचा निर्णय घ्यावा लागला. भारत हाच आशियात क्रिकेटचा सर्वात मोठा ग्राहक असल्याने भारतीय संघ नसता, तर ही स्पर्धा असून नसल्यासारखीच झाली असती.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–६८३ दि.२४.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान भारत गणपत सांगळे, रा.महाकाळा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **आई वडीला**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मुक्ताबाई गणपत सांगळे | आई | २३.१०.२०२३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– २४/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**कार्यालय नगरपंचायत तीर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना**
**प्रशासकीय इमारत, तीर्थपुरी**
जा.क्र.२०२५/नपतो/ जा.प्र.ना.वि./कावि– २४४३
दिनांक : ०१/१०/२०२५

### जाहिर प्रगटन

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार ज्योती दत्तात्रय बहिर रा. एकलहेरा ता. अंबड जि.जालना यांनी गट नं.(–) सिटी सर्वे नं. (–) ग्रा.पं.कालिन नगरपंचायत मिळकत क्र. ४६४५ क्षेत्र ११०० चौ.फु. जागा नामे रामप्रसाद हरिनारायण तोष्णीवाल रा. तीर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर खरेदीखत खरेदीखत दस्त क्र. ३९१३/२०१५ दि. २३/०७/२०२५ अन्वये खरेदी केली आहे.

खरेदी खरेदीखत सत्यप्रत जोडुन आवक क्र. (२०३८) दिनांक १४/०८/२०१५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा रामप्रसाद हरिनारायण तोष्णीवाल रा.तीर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना यांच्या नावावर असलेले गट नं. (–) सिटी सर्वे नं. (–) ग्रा.पं.कालिन नगरपंचायत मिळकत क्र. ४६४५ क्षेत्र ११०० चौ.फु. म्हणजेच २०२.१९ चौ.मी. ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व –शंकर बोबडे यांची जागा
पश्चिम – २५ फुट रुंदीचा रस्ता
दक्षिण –न.पं. मिळकत नं. ४६४४
उत्तर – न.पं. मिळकत नं. ४६४६

या वरील चतुः सिमा मधील क्षेत्र १०२.१९ चौ.मी. सहन जागा खरेदीखत पत्रा आधारे नामांतर करणे बाबत काही उजर आक्षेप / तक्रार असल्यास सदर जाहिरप्रगटन प्रसिध्द झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराच्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचे काहीही म्हणने नाही, असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/–**
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत नगर पंचायत तीर्थपुरी**



# जाफराबादेत नवदुर्गा आदर्श नगर मित्र मंडळाची सातवी माळ महाआरती

**प्रतिनिधी** @ जाफराबाद

शारदीय नवरात्रीच्या पावन पर्वावर जाफराबाद शहरातील नवदुर्गा आदर्श नगर मित्र मंडळ, वार्ड क्र.२ येथे सातव्या माळेची महाआरती नगराध्यक्षा सौ.कविता ताई दिपक पाटील वाकडे यांच्या हस्ते संपन्न झाली.या प्रसंगी मंडळाच्या वतीने नुकत्याच नगराध्यक्षा पदी झालेल्या त्यांच्या निवडीबद्दल त्यांचा सत्कार करून विशेष सन्मान करण्यात आला.

संध्याकाळी आरतीसोहळा सुरू होताच परिसरात भक्तिगीतांचा गजर, ढोल–ताशांच्या नादात आणि जय देवी दुर्गा च्या घोषणा दुमदुमल्या. मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून देवीच्या आरतीचा लाभ घेतला. धार्मिक व उत्सवी वातावरणात झालेला हा सोहळा भक्तांच्या मनात अविस्मरणीय ठसा

### जाहीरनामा

**वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**
**श्रीमती एम. एस. कुलकर्णी दिवाणी न्यायाधिश क.स्तर, केज, यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ४१४ / २०२५**
**नि.क. ७ / ड**
**शिवकन्या विरुध्द निरंक**

ज्यापेक्षा मयत, गोपीचंद मारुती इंगळे मौजे सादोळा ता. केज, जि. बीड हे दिनांक ११ माहे ०५ सन २०२४ रोजी गोपीचंद मारुती इंगळे विलासराव देशमुख गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, लातूर ता. जि. लातूर येथे मयत झाले आहेत. अर्जदार यांनी हया कोर्टास सदर गोपीचंद मारुती इंगळे मौजे सादोळा ता. केज. जि. बीड यांचे मृत्यू नंतर त्यांना शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कामकाजाचा लाभ मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज विधिज्ञ श्री. मस्के एस.बी. यांचे मार्फत दाखल केला आहे.

अर्जदार :
०१.शिवकन्या भ्र. गोपीचंद इंगळे, वय ६० वर्षे, धंदा– घरकाम, रा. सादोळा ता. केज जि. बीड.
०२. सर्जेराव पि. गोपीचंद इंगळे, वय–४४ वर्षे, धंदा– शेती रा. सादोळा ता. केज जि. बीड.
०३.शंकर पि. गोपीचंद इंगळे, वय–३५ वर्षे, धंदा – शेती रा. सादोळा ता. केज जि. बीड.

.त्यापेक्षा अर्जदाराशिवाय सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु गोपीचंद मारुती इंगळे मौजे सादोळा ता. केज. जि. बीड यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात देईल.

आज दिनांक २९ माहे ०९ सन २०२५.
पु. ता. ०४/११/२०२५

स्वाक्षरित/–
**वरिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,केज

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८१० / २०२५**
**हेमलता भ्र. आबासाहेब घुमरे वि. निरंक**
**(मार्फत अँड. ए. आर. दानवे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत आबासाहेब पि. बंडाजी घुमरे, रा. खळेगाव ता. गेवराई जि. बीड हे हया दिनांक ०९/०६/२०२५ रोजी मौजे पिंपळे सौदागर, पिंपरी चिंचवड, हावेली, पुणे येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ हेमलता भ्र. आबासाहेब घुमरे, वय ७० वर्षे, धंदा शेती रा. खळेगाव ता. गेवराई जि. बीड ह. मु. अ–५०२ लक्ष्मी आंगण, शिवसाई रोड, पिंपळे सौदागर, आँध कॅम्प, पुणे अर्जदार क्र. २ आकाश पि. आबासाहेब घुमरे, वय ४३ वर्षे, धंदा शेती रा. खळेगाव ता. गेवराई जि. बीड ह. मु. फलॅट न. १००६, लक्ष्मी आयकॉन, कृष्णा चांगा नाईक मार्ग, एच. पी. पेट्रोल पंप जवळ, सेक्टर ४४–अ, सीवूडस पश्चिम, नेरूळ ठाणे, नवी मुंबई, अर्जदार क. ३ क्षितीजकुमार पि. आबासाहेब घुमरे, वय ४० वर्षे धंदा – शेती रा. खळेगाव ता. गेवराई जि. बीड ह. मु. अ–५०२ लक्ष्मी आंगण, शिवसाई रोड, पिंपळे सौदागर, आँध कॅम्प, पुणे अर्जदार क. ४ आदित्य पि. आबासाहेब घुमरे, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. खळेगाव ता. गेवराई ह. मु. लक्ष्मी आंगण सोसायटी, शिव – साई लेन, पिंपळे सौदागर, आँध कॅम्प, पुणे यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार व गैरअर्जदार हे सदरह मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय मंदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत आबासाहेब पि. बंडाजी घुमरे, रा. खळेगाव ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०१/१०/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख:– ११ / ११ / २०२५

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७०३/२०२५**
**वेनुबाई व इतर वि निरंक**
**(मार्फत–ॲड. के. एन. वराट, गेवराई)**

ज्याअर्थी मयत उत्तम सखाराम बंड रा. सावता नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड हे दिनांक ०२/०४/२०२५ रोजी सरकारी रूग्णालय, बीड ता. जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ वेनुबाई भ्र. उत्तम बंड, वय ७९ वर्षे, धंदा – सेवासुश्रुशा रा. सावता नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड अर्जदार क. २ राजेश पि. उत्तमराव बंड, वय ४३ वर्षे, धंदा – सावता नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सदर अर्जदाराच्या उत्तम सखाराम बंड रा. सावता नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २०/०८/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख ३०/०९/२०२५

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–९८७ दि.२५.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान शिवाजी बाबुराव नेमाने रा.नारायणगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सार्थक शिवाजी नेमाने | मुलगा | १९.१०.२०२३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– २५/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–७३३ दि.२०.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान शेख सफ्फान शफीयोद्दीन, रा.गोंदी, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख सफ्फान शफयोद्दीन | स्वतः | ०८.११.२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– २६/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–७३२ दि.२६.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान सीमा बेगम अलीमोद्दीन, रा.गोंदी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख सिमा बेगम अलीमोद्दीन | स्वतः | २४.०६.१९८२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– २६/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–६८२ दि.२४.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान भारत गणपत सांगळे, रा.महाकाळा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **नाती**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | ऋतुजा संतोष बोडखे | नात | २९.०७.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– २४/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–७३१ दि.२६.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान फैजान शफीयोद्दीन शेख रा.गोंदी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **नाती**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | फैजान शफीयोद्दीन शेख | स्वतः | १०.०६.१९९६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– २६/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–७३६ दि.२६.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान अनिस अलीमोद्दीन शेख, रा.गोंदी, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अनिस अलीमोद्दीन शेख | स्वतः | ०१.०१.१९८८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– २६/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–७३६ दि.२६.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान कलीमोद्दीन अलीमोद्दीन शेख, रा.गोंदी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | कलीमोद्दीन अलीमोद्दीन शेख | स्वतः | ०१.०१.१९९३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– २६/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–७३४ दि.२६.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान शेख तकीयोद्दीन अलीमोद्दीन, रा.गोंदी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख तकीयोद्दीन अलीमोद्दीन | स्वतः | ०२.०६.१९८४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– २६/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–७३७ दि.२६.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रईसा बेगम अलीमोद्दीन शेख, रा.गोंदी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रईसा बेगम अलीमोद्दीन शेख | स्वतः | ०१.०१.१९८० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– २६/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# विरखेडा भालके येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला मोठे खिंडार

प्रतिनिधी @ जाफराबाद



जाफराबाद तालुक्यातील विरखेडा भालके येथील राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी गावपातळीवर व तालुका पातळीवर नेतृत्व करणाऱ्या माजी केंद्रिय मंत्री रावसाहेब पा. दानवे साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन भोकरदन जाफराबाद मतदारसंघाचे मा.आमदार संतोष पाटील दानवे यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला.

प्रवेशावेळी आण्णा भालके (मा.सरपंच), बंडू पा.भालके ,रामेश्वर भालके , बापूराव भालके,सुभाष भालके,सदानंद भालके,शिवाजीराव भालके,(वागले)विठ्ठलराव भालके, रामदास महाराज भालके,दत्तू पा. भालके, संदीप भालके , शिवाजी पंडित, गजानन भालके, संतोष भालके, संतोष वामनराव भालके, नागेश भालके, कैलास भालके, प्रकाश जाधव, ज्ञानेश्वर लोखंडे, गुलाबराव सखाराम भालके, श्रीराम भालके(चेअरमन )अरूण भालके, रमेश भालके, ज्ञानेश्वर आण्णा भालके,रवी भालके, सुभाष भालके,(टेलर ) कैलास जाधव, गणपत भालके,डिगाबर भालके,अचितराव भालके,माहादु काकडे, सखाराम उबाळे, अण्णा माणिकराव भालके, नामदेव गायके, सदानंद हिवाळे, गजानन इनामदार, उमेश भालके, ,जीवन भालके,मोहन भालके,नाजूकराव काकडे, मोहन प्रशांत भालके, सखाराम उबाळे,

गावकऱ्यांनी यावेळी गजानन महाराज मंदिरासाठी सभागृह व गावासाठी स्मशानभूमी आवश्यक असल्याचे सांगताच आमदार संतोष पाटील दानवे यांनी दोन्हीही कामे लवकरात लवकर मार्गी लावू, असे आश्वासन गावकऱ्यांना यावेळी दिले.पुढे बोलताना आमदार संतोष पाटील दानवे म्हणाले की मागच्या माझ्या १० वर्षाच्या काळात रस्ते, वीज,पाणी यासाठी जवळजवळ १०-१२ कोटी रुपयांचा निधी विरखेडा गावासाठी उपलब्ध करून दिला आहे . या गावाला असलेल्या धामना नदीवर जे मोठाले सिमेंट बंधारे बांधले गेले ,त्या माध्यमातून विरखेडा भालकी , रेपाळा, मेरखेडा या तिन्ही गावातील जवळपास ५०० शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात शेतीसाठी पाणी उपलब्ध झाल्याने या पाण्याचा फायदा बळीराजा घेऊन ते चांगल्या पद्धतीने उत्पन्न वाढवत आहे .

तसेच यावेळी आमदार संतोष पाटील दानवे यांनी स्वदेशीचा नारा देत ,आपल्या घरगुती वापरामध्ये व शेती व्यवसायामध्ये स्वदेशी वस्तू वापरण्याचे आवाहन करून गावकऱ्यांकडून स्वदेशी संकल्प पत्र भरून घेतले आणि स्वदेशी वस्तू वापरण्यासाठी सर्वांना प्रतिज्ञा सुद्धा दिली. व स्वदेशी संकल्पाची सुरुवात विरखेडा या गावातून केली.यावेळी उपस्थित संतोष पाटील लोखंडे, गोविंदराव मामा पंडित,सुरेशजी दिवटे, सुधीर पाटील, रविराज जैस्वाल, अनिल बोर्डे, जगन्नाथ पंडित, निवृत्ती दिवटे, राजू वैद्य, दिलीप देवडे, अंकुश जाधव , सुखदेव जाधव, अमोल देवडे, प्रदीप देवडे, गणेश जाधव, कृष्ण शिरसाट, निलेश तिखे, विठ्ठल भालके, वसंता भालके, संजय महाराज भालके अंबादास महाराज भालके, विठ्ठल महाराज भालके राजू भालके, हरिभाऊ भालके, दत्तू भालके, इत्यादी सह गावकरी उपस्थित होते.

# केज तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत साने गुरुजी निवासी विद्यालयाचे घवघवीत यश

प्रतिनिधी @ केज



क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे,जिल्हा परिषद बीड,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड व क्रीडा अधिकारी कार्यालय केज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत साने गुरुजी निवासी विद्यालयाने आपल्या यशाची परंपरा कायम ठेवत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत १७ वर्ष मुले रिले १०० गुणिले ४ चार प्रथम,जगताप सिद्धेश्वर लांब उडी द्वितीय, बारगजे अभिषेक गोळा फेक १९ वर्षे तृतीय, २०० मीटर धावणे १९ वर्ष मैंद अभिषेक अनिल प्रथम,सतरा वर्ष मुली थाळीफेक अंजली केंद्रे तृतीय,१९वर्ष २०० मी धावणे प्रथम,४०० मीटर धावणे प्रथम, १०० मीटर धावणे अनिता पांचाळ द्वितीय, तीन किलोमीटर चालणे सर्व द्वितीय निकिता राजगुरू सतरा वर्षे रिले तृतीय,पूजा ठोंबरे लांब उडी तृतीय या सर्व विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवून शाळेच्या क्रीडा यशाची परंपरा कायम ठेवली आहे.या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक सानप सर, साखरे सर मार्गदर्शिका कराड मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले आहे. संस्था अध्यक्ष अड. उद्धवराव कराड,कापसे सर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# धनगर समाजाचा वडवणीत चक्काजाम रस्ता रोको संपन्न



प्रतिनिधी @ वडवणी

दिनांक ०१/१०/२०२५ बुधवार रोजी वडवणी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकल धनगर समाजाच्या वतीने दिपक भाऊ बोरडे यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संविधानाला अनुसरून धनगर समाज गेल्या अनेक वर्षापासून रस्त्यावरची लढाई लढत आहे गेल्या पंधरा दिवसापासून जालना शहरातील अंबड चौफुला येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळ्याच्या नियोजित जागा येथे धनगर समाजाचे संघर्ष योद्धा दीपक( भाऊ) बोराडे हे धनगर समाजाला डढ चे आरक्षण लागू करावे करिता गेल्या पंधरा दिवसापासून आमरण उपोषण करत आहेत त्यांच्या आदेशाने आज वडवणी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे चक्काजाम रस्ता रोको करण्यात आले. धनगर समाजाच्या वतीने करण्यात आले.यावेळी हजारो संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

# पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी जी यांचे देशहितासाठी मोलाचे योगदान प्रदेशाध्यक्ष

## हिंदू धर्मभूषण श्री नंदकिशोर जी महाराज यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी @ जाफराबाद



जाफराबाद तालुक्यातील सावरखेडा गोंदण या गावी राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता या सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत दिन. ३० वार मंगळवारी श्री नरेंद्र दामोदरदास मोदी जी यांच्या अभिष्टचिंतनाचे औचित्य साधून मुलांना कला या क्षेत्रात वाव मिळण्यासाठी माजी सरपंच श्री कैलास पाटील वायाळ यांच्या माध्यमातून चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती यावेळी मा . तंटामुक्ती अध्यक्ष व गोरक्षण समिती प्रदेशाध्यक्ष श्री नंदकिशोर जी महाराज वायाळ पाटील हिंदू धर्म रक्षक यांनी आपले विचार व्यक्त करीत असताना राष्ट्रसंता च्या विचाराचे समर्थन करीत एक तरी अंगी असू दे कला नाही तरी व्यर्थ हो का जन्माला आला चित्रामुळे चित्र चरित्र व चारित्र्य निर्माण होण्यासाठी मदत होते ओ मोदीजी यांचे विचार व कार्य देशाची उंची वाढविण्यासाठी व युद्ध पातळीवरती प्रगती विकसनशील भारत बनविण्यासाठी मोलाचे योगदान आहे असे प्रतिपादन वायाळ महाराज यांनी या वेळी व्यक्त केले तसेच व्यक्ती व मानवी जीवन हे पदाने मोठे होत नसून त्यांच्या कृती कार्याने मोठे होत असते हे आपण या निमित्ताने स्मरण ठेवावे त्यामुळे आज राष्ट्रपिता ही पदवी महात्मा गांधी यांना समाजसेवा कार्यामुळे शोभून दिसत असल्याचे विधान सुद्धा यावेळी नंदू पाटील यांनी केले तसेच आयुष्यमान भारत या मोदीजींच्या संकल्पना अंतर्गत मुलांसाठी आज सर्दी ताप खोकला थंडी ताप घसा खवखवणे हात पाय दुखणे मळमळ उलटी कप या सर्व आजारावरती प्राथमिक स्वरूपाचे गोळ्या औषधे वाटप करण्यात आले यावेळी आरोग्य सेवक अधिकारी श्री पंकज पायघन साहेब कैलास पाटील वाया ल श्री नाना पाटील पंडित सर पंच प्रतिभा नितीन वायाळ तंटामुक्ती अध्यक्ष प्रकाश वाया वायाळ शालेय समिती श्री नंदकिशोर पाटील वाया ल पंढरी वायाळ योगेश वायाळ गणेश पालकर हरिदास पाटील वायाळ खंडू पाटील वायाळ विद्यानंद वाया ळ बिडवे मॅडम विद्यमान शिक्षक मोहन खरात सर आदरणीय वायाळ सर निमसे सर शिंगणे सर अंभोरे मॅडम संदीप मिसाळ रमेश उबाळे गणेश पालकर भगवान वाया ग्रामसेवक बाहेकर साहेब कृष्णा वायाळ पंडित मामा यासह आदी गावकरी मंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते यावेळी खरात सर यांनी सर्वांचे आभार माणि त विजय हो विजय हो भारत देश हमारा या राष्ट्र संतांच्या गीताने समारोप करण्यात आला

# पिंटू महादेवनच्या वक्तव्याचा जाफराबाद काँग्रेसकडून निषेध

प्रतिनिधी @ जाफराबाद



**कठोर कारवाईची मागणी**

भाजपा नेता प्रिंटू महादेवने काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या संदर्भात केलेल्या वक्तव्याचा जाफराबाद तालुका काँग्रेस कमिटीने तीव्र निषेध नोंदवला. तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अजय हरिभाऊ बनकर यांनी जाफराबाद पोलिस ठाण्याचे पीआय सतीश जाधव यांना निवेदन सादर करून या प्रकरणी कठोर कारवाईची मागणी केली.

प्रिंटू महादेवने राहुल गांधी यांच्याबद्दल छातीमध्ये मध्ये गोळ्या मारू अशी असभ्य व अमानुष टिप्पणी केली असून हे केवळ राहुल गांधींचा अपमान नसून संपूर्ण लोकशाही व्यवस्थेवरच आघात आहे, असा आरोप अजय बनकर यांनी यावेळी केला.

काँग्रेस कमिटीच्या निवेदनात दोन प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. प्रिंटू महादेव विरोधात तातडीने एफआयआर नोंदवून कठोर कायदेशीर कारवाई करावी. भविष्यात अशा अमानुष, असभ्य व असंवैधानिक वक्तव्यांवर आळा बसावा यासाठी ठोस पावले उचलावीत. या निषेध निवेदनावर ज्ञानेश्वर शिंदे, भगवान लोखंडे, पंकज लोखंडे, शेख मोईज, शेख इरफान, शेख इस्माईल, शेखा मजीद, मेहबूब खान पठाण, समीर शाह आदींची स्वाक्षरी आहे.

या प्रसंगी बोलताना अजय बनकर म्हणाले की, लोकशाहीत विचारांचे मतभेद असू शकतात; पण हिंसात्मक व अमानुष भाषा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाही. हे वक्तव्य संविधान आणि लोकशाही मूल्यांचा अपमान आहे. त्यामुळे यावर तातडीने कारवाई व्हावी.

# गल्हाटी नदीच्या पुरामुळे उद्ध्वस्त पिठोरी-सिरसगाव शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्या

## वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष किशोर तुपे यांची तहसीलदारांकडे मागणी

प्रतिनिधी @ अंबड

**यंदाच्या अतिवृष्टीने मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. गोदावरीची उपनदी असलेल्या गल्हाटी नदीने यावर्षी रौद्ररूप धारण करून पिठोरी व सीरसगाव परिसरात प्रचंड कहर केला. नदीचे पाणी घरात शिरल्याने गावकऱ्यांचे संसार उद्ध्वस्त झाले असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर पीकनुकसान झाले आहे.**

सोयाबीन, कापूस, तूर, मूग, ऊस, मोसंबी, उडीद अशी पिके पुराच्या पाण्यात सडून गेलेली आहेत. अनेक जनावरे वाहून गेली किंवा दगावली, तर घरातील धान्य, कपडे, संसारोपयोगी वस्तू वाहून गेल्याने शेतकऱ्यांवर दिवाळीच्या उंबरठ्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. गावातील मजूर, बारा बलुतेदार आणि मागासवर्गीय कुटुंबे याही आपत्तीमुळे उघड्यावर पडली आहेत.या गंभीर परिस्थितीतही शासनाकडून अद्याप पंचनामे पूर्ण झालेले नाहीत आणि नुकसान भरपाईबाबत ठोस पावले उचललेली नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष आहे.यावर वंचित बहुजन आघाडीचे अंबड तालुकाध्यक्ष किशोर भगवान तुपे यांनी पुढाकार घेत तहसीलदार यांच्याकडे निवेदन दिले. त्यांनी मागणी केली की पिठोरी व सिरसगाव येथील पुरग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी. शासनाने आणखी विलंब न करता शेतकऱ्यांचे अश्रू पुसावेत, नाहीतर संतप्त शेतकरी रस्त्यावर उतरणार आहेत.

**मा.श्री. आर. एस. ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १३१२/२०२५**
**( मार्फत विधिज्ञ श्री प्रतिमा एन जरांगे )**
**अर्जदार :- १. प्रल्हाद पि. बाबुराव घोडके, वय ७० वर्षे, धंदा-निरंक,**
**रा. जानकी नगर, पिंपरगव्हाण रोड, बीड, ता.जि. बीड.**
**विरुध्द निरंक**
**प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी मयत नामे सरस्वती ग्र. प्रल्हाद घोडके या दिनांक १४/०६/२०२५ रोजी मोटार अपघातातत पुणे येथे मयत झालेले असुन अर्जदार हा मयताचा पती आहे. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कात त्याचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- २४/०९/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिली.

पुढील तारीख:- १७/१०/२०२५.

**आदेशावरून/-**
**स्वाक्षरित/-**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**व.स्तर, बीड**

# प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ तसेच रोट्रॅक्ट क्लबचा अंबाजोगाई दांडिया महोत्सव- २०२५ मोठ्या हर्षोल्हासात संपन्न

## वैष्णवी आडे, रेणुका अपूर्वा, प्रगती जाधव या ठरल्या फ्रीज, टिव्ही व वॉशिंग मशीनच्या मानकरी

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ तसेच रोट्रॅक्ट क्लब ऑफ अंबाजोगाईच्या वतीने आयोजित अंबाजोगाई दांडिया महोत्सव-२०२५ चा समारोप मोठ्या झगमगाट व थाटामाटात सहभागी स्पर्धकांच्या मोठया हर्षोउल्हासात संपन्न झाला. या स्पर्धेच्या विजेत्या होण्याचा बहुमान वैष्णवी आडे यांनी मिळवला तर उपविजेत्या ठरल्या रेणुका अपूर्वा व प्रगती जाधव. प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षीदेखील संकेत मोदी यांच्या नियोजन तथा मार्गदर्शनाखाली दि २७ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर दरम्यान अंबाजोगाई शहरातील गरबा प्रेमींसाठी अंबाजोगाई दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या दांडिया महोत्सवात शहरातील ५०० दांडिया प्रेमी स्पर्धकांनी या महोत्सवाचा लाभ घेतला. या तीन दिवसीय दांडिया महोत्सवात दररोज एक नवीन थीम सहभागी स्पर्धकांना देण्यात आली होती. यामध्ये महाराष्ट्रीयन, सिनेमा, आणि गुजराती थीमचा समावेश होता.

या तीन दिवसीय अंबाजोगाई दांडिया महोत्सव-२०२५ चा शुभारंभ शहरातील विविध मान्यवरांच्या विशेषतः महिलांच्या हस्ते करण्यात आला होता. शहरातील विविध महिलांचा सन्मान देखील या महोत्सवा दरम्यान केला गेला. दररोजच्या विजेत्या स्पर्धकांना पैठणी देण्यात येत होती. तीन दिवसीय या स्पर्धेच्या विजेत्या स्पर्धकां मधून शेवटी



उत्कृष्ट जोडी, उत्कृष्ट महिला स्पर्धक त्याचबरोबर उत्कृष्ट बाल स्पर्धक अशी निवड करून विजेत्यांना बक्षिसांचे वाटप करण्यात आले.

प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ व रोट्रॅक्ट क्लब ऑफ अंबाजोगाई च्या वतीने आयोजित दांडिया महोत्सवात प्रथम क्रमांकाचे बक्षिस (डबल डोअर गोदरेजचे फ्रीज) हे वैष्णवी आडे यांना देण्यात आले. द्वितीय क्रमांक एलईडी टीव्ही साठी रेणुका अपूर्वा त्याचबरोबर प्रगती जाधव यांनी वॉशिंग मशिन जिंकत तृतीय क्रमांक पटकावला. लहान मुलींमध्ये प्रथम क्रमांक कु भक्ती दरगड हिने मिळवत सायकलच्या स्वरूपात मंडळाकडून प्रथम बक्षीस हस्तगत केले. तर कु काव्या गणेश देशमुख हिची द्वितीय क्रमांकासाठी निवड करत तिला स्मार्ट वॉच बक्षीस देण्यात आले. जोडी स्पर्धकां मध्ये ऋतुजा खोपकर व रजत जेधे यांनी प्रथम क्रमांक मिळवत टायटन कपल वॉच मिळवली . तर श्रद्धा सोमाणी व दर्शन मंत्री यांनी द्वितीय क्रमांक मिळवत चांदीचे ब्रेसलेट बक्षीस स्वरूपात मिळवले. तृतीय क्रमांक कु जेनी डागा व आदित्य लोढा यांनी रेमंड कपल गिफ्ट पॅक जिंकला. संपूर्ण दांडिया महोत्सवात या स्पर्धेची रीलस्टार म्हणून कु सिया गित्ते हिला स्मार्ट वॉच तर उत्तेजनार्थ पारितोषिक चि विरेन सचिन जाधव याला प्रोत्साहनपर पारितोषिक वितरित केल्या गेले. दांडिया महोत्सवातील स्पर्धेत विजेते स्पर्धकांची निवड करण्यासाठी लातूर येथुन क्रीडा क्षेत्रातीलच जाणकार परीक्षकांना आमंत्रित करण्यात आले होते. या परीक्षकांनी कुठल्याही प्रकारचा भेदभाव न करता अतिशय पारदर्शक पणे या दांडिया महोत्सवातील स्पर्धेचा अंतिम निकाल जाहीर केला. तर संचलन पुणे येथील कु तेजस्वी चव्हाण हिने अतिशय उत्तम प्रकारे सांभाळले.

या स्पर्धेदरम्यान आलेल्या विविध पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना राजकिशोर मोदी व संकेत मोदी यांनी दोन वर्षांपासून सुरू केलेल्या दांडिया महोत्सवाचे कौतुक करतांना अंबाजोगाई शहरातील दांडिया प्रेमींना एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन व आभार व्यक्त केले. नुकत्याच संपन्न झालेल्या गणेशोत्सवात संकेत मोदी यांनी ढोलताशा स्पर्धा अतिशय उत्तम रित्या आयोजित करून अंबाजोगाई शहरातील प्राचीन संस्कृती जोपासण्याचे काम केले आहे. या ढोलताशा स्पर्धेत देखील अंबाजोगाई शहरातील गणेश मंडळाच्या ढोलताशा वाद्य पथकांनी अतिशय उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला होता. यावेळी देखील विजेत्या स्पर्धकांना रु ३१०००/- ,२५०००/-, २१०००/- रोख बक्षीस देण्यात आले होते. प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ हे मागील ३५ वर्षापासून अंबाजोगाई शहरात अनेक क्रीडा, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर राहिले आहे.

# आ. सुरेश धस यांची मंत्री भरत गोगावले यांच्याकडे उपाययोजना करण्याची मागणी

प्रतिनिधी @ आष्टी



आष्टी विधानसभा मतदारसंघातील आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील अनेक गावांमध्ये अतिवृष्टी आणि ढगफुटीमुळे शेतकऱ्यांचे नागरिकांचे अतोनात नुकसान झाले असून रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या सिंचन विहिरी बोजल्या गेल्या वाहून गेल्या असून कांदा चाळ यांचे देखील अतोनात नुकसान झाले आहे. त्याचबरोबर फळबागा देखील नष्ट झाल्या आहेत. या शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत उपाययोजना करण्याची मागणी आ. सुरेश धस यांनी रोहयो मंत्री भरत गोगावले यांचेकडे केली आहे.मंत्रालयामध्ये प्रत्यक्ष मंत्री महोदयांची (दि. ३०) भेट घेऊन त्यांनी या मागणीबाबत निवेदन दिले असता मंत्री महोदयांनी सकारात्मक कारवाईचे आश्वासन दिले आहे.

या भेटीत आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यातील अनेक गावातील अतिवृष्टीमुळे बुजलेल्या आणि वाहून गेलेल्या सिंचन विहिरींच्या दुरुस्तीबाबत चर्चा केली. दि. १४, १५ आणि १६ ऑगस्ट २०२५ या तीन दिवसांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे आष्टी तालुक्यातील मेहकरी, सीना, कांबळी, कडी, बोकडी आणि शिरूर (कासार) तालुक्यातील सिंदफणा, किना, कापरी या नदी पात्रातील उच्च दाबामुळे नदीपात्रा लगतच्या शेतजमिनीमध्ये शेतकऱ्यांच्या वैयक्तिक सिंचन विहिरी बुजल्या किंवा वाहून गेल्या. विद्यमान शासन निर्णयानुसार १.५ लक्ष रुपयांची रक्कम मंजूर होती, परंतु नुकसान भरून काढण्यासाठी ही रक्कम ३ लक्ष रुपये करण्यात यावी, अशी विनंती मंत्रीमहोदयांना केली.

तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कांदाचाळ बांधकामासंबंधीही चर्चा झाली. शासन निर्णयानुसार दि. १८/०५/२०२३ रोजी वैयक्तिक कांदाचाळ बांधकामास मंजुरी देण्यात आली होती, परंतु दि. ९/७/२०२४ च्या शासन शुद्धीपत्रकानुसार सामूहिक कांदाचाळ बांधकाम करणे आवश्यक असल्याचे निर्देश आले. अनेक गावांमध्ये सामूहिक बांधकाम करण्यास अडचणी असल्यामुळे, वैयक्तिक कांदाचाळ बांधकामासही मंजुरी देण्याची आवश्यकता असल्याचे मंत्रीमहोदयांच्या निदर्शनास आणून दिले. त्याचबरोबर आष्टी विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये दि. १४ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टीमुळे नद्यांच्या महापुरामुळे संत्रा, डाळिंब, मोसंबी, केळी, लिंबू, द्राक्ष यासह अन्य फळझाडांच्या बागा नष्ट झाल्या. शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असल्याने राज्य फलोत्पादन विभागाच्या माध्यमातून दुबार लाभ देऊन आर्थिक दिलासा मिळावा, अशी विनंती केली. तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत चालू असलेल्या सार्वजनिक रस्ते, शाळा कंपाउंड यांसारख्या कामांची सद्यस्थिती तपासणी करून आवश्यक सुधारणा करण्यात यावी याबाबत मंत्रिमहोदयांनी या उपाययोजनां करण्याबाबत तात्काळ कार्यवाही होईल असे आश्वासन दिले आहे.

# एस.टी.आरक्षणासाठी वडीगोद्रीत चक्काजाम आंदोलन सरकारला जागे करण्यासाठी रणशिंग फुंकले

**आरक्षणाची अंमलबजावणी न झाल्यास धनगरांचा संघर्ष आणखी तीव्र होईल. शांततेचा मार्ग आम्ही आतापर्यंत अवलंबला पण आता निर्मात्यावर आंदोलन नेले जाईल**

फारूख शेख @ अंबड



धनगर समाजाचा संयम आता संपत चालला आहे. घटनादत्त एस.टी.आरक्षणाची अंमलबजावणी करण्याच्या मागणीसाठी आज वडीगोद्री कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर सकल धनगर समाजाच्या वतीने सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर भव्य चक्काजाम आंदोलन करण्यात आले. रस्त्यावर बसून समाजबांधवांनी आरक्षण द्या नाहीतर संघर्षाला तयार राहा अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ मध्ये बारामती येथे धनगर समाजाला दिलेला शब्द आजवर पाळलेला नाही, अशी संतप्त टीका आंदोलकांनी केली. दि. १७ सप्टेंबरपासून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक अंबड चौफुली जालना येथे समाजनेते मा. दीपक बोऱ्हाडे हे उपोषणास बसले असून आज त्यांचा १५ वा दिवस सुरू आहे. मात्र सरकारने अजूनही या उपोषणाची दखल घेतलेली नाही. यामुळे समाजबांधवांमध्ये तीव्र रोष उसळला आहे.

आंदोलनात वक्त्यांनी इशारा दिला की धनगर समाजाच्या एस.टी. आरक्षणाच्या मागणीवर तातडीने निर्णय न घेतल्यास बोऱ्हाडे यांच्या आदेशानुसार राज्यभरात धनगरी बाणाने आक्रमक आंदोलन उभारले जाईल. शासनाने या लढ्याची परीक्षा घेऊ नये.यावेळी वडीगोद्रीचे सरपंच पंढरीनाथ खटके, गुंडेवाडीचे सरपंच विठ्ठल सुडके, बंडू मुंडे दोदडगाव सरपंच नारायण रावजी वायाळ श्रीमंत खटके पंडितराव गावडे विजय नाजरकर रवींद्र खोमणे ,विजय खटके, अभिराजे पवार, राजू पवार, संभाजी गावडे, राजेंद्र पवार, आनंद पवार सुधीर बोंबले, बाळासाहेब हरे, संतोष हरे, अनिकेत खटके, अभिजीत खटके बाळासाहेब गावडे गणेश गावडे नानासाहेब नाझरकर तात्यासाहेब खटके विठ्ठल गावडे दत्त गावडे संतोष लिपणे संभाजी अर्जुन गावडे आदींसह मोठ्या संख्येने सकल धनगर समाज बांधव उपस्थित होते.




# मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी श्री मत्स्योदरी देवी संस्थानचा मदतीचा हात

**मुख्यमंत्री सहाय्यता निधीस १ लाख ११ हजार १११ रुपयांची आर्थिक मदत सुपूर्द**

प्रतिनिधी @ अंबड

सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यासह महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर जनजीवन विस्कळीत झाले. अनेक कुटुंबांचे संसार उध्वस्त झाले, हजारो लोकांवर उपजीविकेचे संकट ओढवले. अशा कठीण परिस्थितीत सामाजिक बांधिलकी जपत श्री मत्स्योदरी देवी संस्थान अंबड यांनी मदतीचा मोठा हात पुढे करत पूरग्रस्तांना दिलासा दिला आहे.संस्थानच्या वतीने १ लाख ११ हजार १११ रुपये इतकी आर्थिक मदत मुख्यमंत्री सहायता निधीसाठी जाहीर करून चेक क्र. ३५४४४ द्वारे सुपूर्द करण्यात आली.

दि. ०१ ऑक्टोबर २०२५ रोजी जालना येथील जिल्हाधिकारी कार्यालयात संस्थानचे अध्यक्ष तथा तहसीलदार श्री. विजय चव्हाण यांच्या हस्ते हा मदतीचा चेक अधिकृतरीत्या जिल्हाधिकारी यांना सुपूर्द करण्यात आला. मंदिराचे व्यवस्थापक कैलासराव शिंदे यांनी देखील या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

पूरामुळे बाधित झालेल्या कुटुंबांना दिलासा मिळावा या हेतूने संस्थानने केलेल्या या मदतीचे सर्वत्र कौतुक होत आहे. समाजाच्या दुःखद प्रसंगात प्रत्येक धार्मिक व सामाजिक संस्थेने पुढाकार घेणे हीच खरी सेवा आहे असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# श्री.खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात ४३० जणांची झाली नेत्र तपासणी

प्रतिनिधी @ अंबाजोगाई




**नमो नेत्र संजीवनी स्वास्थ्य अभियान**

येथील श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात मंगळवारी नमो नेत्र संजीवनी अभियानांतर्गत मोफत नेत्र तपासणी व उपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ४३० जणांची नेत्र तपसणी झाली. यातील दृष्टिदोष असणाऱ्या मुलांवर स्वाराती रुग्णालयात उपचार होणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसा निमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत सेवा पंधरवडा उपक्रम जाहीर केला. यानिमित्त नमो नेत्र संजीवनी अभियाना अंतर्गत धर्मादाय आयुक्त कार्यालय बीड, व खोलेश्वर विद्यालयाच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरासाठी उद्घाटक म्हणून प्रदिप चौधरी

(उपायुक्त,धर्मादाय,बीड) तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे होते.प्रमुख अतिथी म्हणून डॉ.ज्ञानोबा दराडे,(नेत्र विभागप्रमुख,स्वा.रा.ती.रूग्णालय)प्रा.डॉ.एकनाथ शेळके,निखील सुरवसे (तंत्रज्ञ आंनदऋषी रूग्णालय,अहिल्या नगर), किरण कोदरकर (कार्यवाह, स्थानिक व्यवस्था मंडळ), अविनाश मुडेगांवकर(शालेय समितीचे अध्यक्ष),विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले यांची उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.ज्ञानोबा दराडे म्हणाले की, विद्यार्थी,शिक्षक व पालकांनी नेहमी आपल्या डोळ्यांची काळजी घेतली पाहिजे.पुस्तक वाचन करताना नेहमी ३०-३५ सेमी अंतर राखावे.वाचन करताना प्रकाशाची व्यवस्था पुरेशी असावी.आधुनिक साधनांचा वापर करताना 'कॉम्प्युटर व्हिजन विड्रोम' या नवीन आजारांपासून आपण सावध राहिले पाहिजे. असा सल्ला त्यांनी दिला. उद्घाटन पर बोलताना धर्मादाय,उपायुक्त प्रदिप चौधरी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. सकस आहार व व्यायामातूनच व्यक्तिमत्व घडते.यासाठी व्यायाम व मैदानी खेळ खेळा.डोळयांची काळजी घ्या व निरोगी रहा.असे आवाहन त्यांनी केले.अध्यक्षीय समारोपात डॉ.अतुल देशपांडे यांनी निरोगी राहण्याचा मूलमंत्र दिला.कार्यक्रमाची सुरुवात भारतमाता व सरस्वती देवीच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

कार्यक्रमाचे संचलन अश्विनी सुर्यवंशी यांनी केले,स्वागत व मान्यवरांचा परीचय राजेंद्र शेप यांनी करून दिला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविनाश मुडेगांवकर यांनी केले.तर उपस्थितांचे आभार रूपाली मुळे यांनी मानले.ज्योती शिंदे यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.या शिबीराच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक अनंतराम कोपले,उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे,पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,पर्यवेक्षिका रूपाली मुळे,अभ्यासपुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे ,शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यांनी परिश्रम घेतले.

# अतिवृष्टीग्रस्त गावांना ग्लोबल विकास ट्रस्टकडून मदतीचा हात

प्रतिनिधी @ परळी वैजनाथ




**दसरा - दिवाळी साजरी करता यावी यासाठी हजारो किराणा किटचे शेतकरी कुटुंबियांना वाटप**

शेतकऱ्यांचे दुःख वाटून घेता येणे अशक्य आहे. नैसर्गिक संकटे आणि आपत्तीशी नेहमी संघर्ष करावा लागलेल्या बळीराजाचे दुःख डोंगराएवढे मोठे असून यंदाच्या अस्मानी संकटाने शेतकरी राजा पूर्णतः कोसळला आणि ढासळला आहे. झालेल्या अतिवृष्टीने शेतातील पिके वाहून गेली, त्याबरोबरच शेतातील सुपीक मातीही खरवडून वाहून गेली. अनेक गावांतील नद्या नाले तुडुंब वाहिल्याने मोठे नुकसान झाले आहे. यामुळे दबलेला आणि खचलेला शेतकरी दसरा आणि दिवाळी काशी साजरी करणार? ऐन सणासुदीच्या दिवसांत अतिवृष्टीने त्याच्या आनंदावर विरजण पडले. अशा अवस्थेत जलनायक मयंक गांधी यांनी स्थापित केलेली ग्लोबल विकास ट्रस्ट ही संस्था शेतकऱ्यांच्या मदतीला धावून आली आहे. मोतीलाल ओसवाल फाऊंडेशन आणि बोरोसिल रिन्यूबल्सच्या सहकार्याने नुकसानग्रस्त शेतकरी कुटुंबियांना किराणा किटचे वाटप करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना छोटीसी मदत म्हणून हा उपक्रम राबविण्यात येत असून याचा बुधवार दिनांक ०१ ऑक्टोबर रोजी भिलेगाव येथून जलनायक मयंक गांधी यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. ३ हजार पेक्षा जास्त शेतकरी कुटुंबियांना याचा थेट लाभ होणार आहे.

जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाचे दुःख आणि परिस्थिती पाहून मनाला अतिव वेदना होतात. मी गावोगावी जाऊन जेंव्हा परिस्थिती पाहिली तेंव्हा मात्र मला रात्रभर झोप लागली नाही. आज सणासुदीच्या काळात शेतकरी संकटात सापडल्याने त्यांचे कुटुंबीय आणि मुलाबाळांचा आनंद हिरावून घेतल्याप्रमाणे झाले होते. आता पुढे कसे होणार? दसरा - दिवाळीला पैसे कोठून आणणार? असा प्रश्न त्यांना भेडसावू लागला होता. वास्तविक परिस्थिती पाहून त्यांना मदत करायला पाहिजे असा विचार माझ्या मनात आला. मी मागील काळात जवळपास ६७ वर्षांचे आयुष्य जगलो. एवढ्या वर्षांत मी शेतकऱ्यांनी पिकवलेले अन्न खाल्ले. त्याची उतराई होणे शक्य नाही मात्र शक्य होईल तेवढे जास्तीत जास्त काम शेतकऱ्यांसाठी मला करायचे आहे. याच भावनेतून मी मदतीसाठी काही फोन लावले आणि त्यांच्याकडूनही होकार आला. मोतीलाल ओसवाल फाऊंडेशन आणि बोरोसिल रिन्यूबल्सने मदतीचा हात पुढे केल्याने आम्ही हजारो शेतकरी कुटुंबियांना किराणा सामानाचे वितरण करत आहोत. शेतकऱ्यांना त्यातून थोडा दिलासा मिळू शकेल आणि त्यांच्याही घरात दसरा दिवाळी उत्साहात साजरी केली जाईल याचे मला मनस्वी समाधान वाटत असल्याची प्रतिक्रिया जलनायक मयंक गांधी यांनी व्यक्त केली. तालुक्यातील मौजे भिलेगाव येथे किराणा किट वितरण उपक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. विठ्ठल रखुमाई मंदिर येथे आयोजित बैठकीस गावातील हजारो नागरिकांची उपस्थिती होती. भिलेगाव येथील शेकडो कुटुंबियांना किराणा किटचे वितरण करण्यात आल्यानंतर ग्रामस्थांनी जलनायक मयंक गांधी यांच्यासह सर्व संयोजकांचे आभार मानले.

**किराणा किटमध्ये २२ वस्तूंचा समावेश**

परळी वैजनाथ तालुक्यातील अनेक गावांतील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीने प्रचंड नुकसान झाले असून ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने शेतकरी कुटुंबियांना किराणा किटचे वाटप करण्यात येत आहे. ३ हजार पेक्षा जास्त शेतकरी कुटुंबियांना ही मदत केली जाणार आहे. मदत म्हणून दिल्या जाणाऱ्या किराणा किटमध्ये एकूण २२ अत्यावश्यक वस्तूंचा समावेश आहे. गहू आटा बॅग, साखर, तांदूळ, तेल, चणाडाळ, पोहे, शेंगदाणे, रवा, मैदा, मीठ, गुळ, तूरडाळ, मुगडाळ, मसुरदाळ, मुरमुरे, चहा पत्ती, लाल मिर्ची पावडर, हळद, जिरे, खोबरे तेल, अंगाची साबण तसेच निरमा आदी वस्तूंचा या किटमध्ये समावेश करण्यात आला आहे.

# राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेतर्फे विविध मागण्यांसाठी

**जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय उपोषणासाठी उपस्थित राहावे. - शंकर झाडे**



प्रतिनिधी @ वडवणी

राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या वतीने दिनांक ०३/१०/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी १० वा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बीड येथे शेख अफसर बशीरमिया क्षेत्रीय अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत एक दिवसीय उपोषण व लक्षवेधी आंदोलन करण्यात येणार आहे.. राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातील शिक्षक व शिक्षकेतर या पदावर २००४ पासून अत्यंत अल्प मानधनावर कार्यरत होते.

सदरील प्रकल्प हा २०२१ पासून समग्रह शिक्षा अभियानात विलिन करण्यात आला आहे. विलीन करताना

यामध्ये कर्मचाऱ्यांचा कोणताही १६ जिल्ह्यातील शिक्षक कर्मचारी चा विचार करण्यात आलेला नाही कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीची कुऱ्हाड केंद्र शासनाच्या या निर्णयामुळे कोसळली आहे. २००४ पासून महाराष्ट्रातील या प्रकल्पात काम दिलेल्या सेवेचा मोबदला म्हणून

२०१६ पासून राज्य शासन तथा केंद्र शासन यांच्याकडे शासकीय सेवेत समायोजन करण्यासाठी साधी वेळोवेळी पाठपुरावा आम्ही करत आहोत . करिता राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी व यावर तत्काळ निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत समयोजन करण्यात यावे अशी मागणी यावेळी करण्यात येणार आहे.. यासाठी बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पपातील शिक्षक, लिपीक, शिपाई कर्मचारी यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राज्य सचिव शंकर झाडे सर, शेख अफसर सर क्षेत्रीय अधिकारी, राहुल घनगाव जिल्हा अध्यक्ष, मैंद शहाजी सर , संजय सांबळे सर, सचिन दिवटे, व्यंकटी काळे सर यांनी आवहान केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# हा लढा आपण मिळून लढू - सरकारला भांडल्या शिवाय गप्प बसायचे नाही - बाळराजे पवार

प्रतिनिधी @ गेवराई

एक तर , दर चार वर्षाला आपण दुष्काळाचा सामना करत आलोत. सरकार निव्वळ वेळ काढू पणा करते. हा सगळा अनुभव आपल्या पाठीशी आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, गोदाकाठची ३३ गावे यातना भोगत आलीत. आज एवढे मोठे नुकसान झाले आहे. आता, या पुढे गप्प बसून चालणार नाही. आपल्या वेदना सरकार समजून घेणार नसेल तर आपल्याला सामूहिक लढा उभारून, न्याय घेऊ ,असे प्रतिपादन युवा नेते बाळराजे पवार यांनी येथे केले.

लोकनेते बाळराजे दादा पवार यांनी बुधवार ता. १ रोजी गेवराई तालुक्यातील पूरग्रस्त भागाचा चौथ्यांदा दौरा केला. तालुक्यातील आगर नांदूर या गावासह त्यांनी विविध भागातील पूरग्रस्तांच्या भेट घेतल्या. त्यांच्याशी विविध प्रश्नांवर, समस्यांवर चर्चा केली. . गेवराई तालुक्यातील ३० ते ३५ गावांना पुराचा धोका निर्माण झाला होता. रात्री प्रशासनाने तातडीने काही नागरिकांचे स्थलांतर केले होते.

यामध्ये सावळेश्वर, पांचाळेश्वर, बोरगाव, गुळज, नागझरी, आगर नांदूर, हिंगणगाव, गोंदी, कटचिंचोली, पांगुळगाव, मिरगाव, काठोडा, राजापूर, गंगावाडी, रामपुरी, गोपत पिंपळगाव, श्रीपत अंतरवाला यासह अनेक गावांचा समावेश आहे. या गावांना बाळराजे पवार यांनी भेटी देऊन पूरग्रस्त भागाची पाहणी केली.यावेळी बोलताना बाळराजे पवार म्हणाले की, गेवराई तालुक्यातील जवळपास ९० हजार हेक्टर शेतजमीन क्षेत्रातील पीकांचे नुकसान झाले आहे. घरादारात पाणी आले. जीवनावश्यक वस्तू पाण्यात गेल्या आहेत. घरे दारे असून, घराबाहेर पडून जीव वाचवायची दुर्दैवी वेळ आली आहे. हे दुःख खूप भयकर आणि तेवढेच वेदनादायक आहे. खरीप हंगामातील पीके हाताशी आली होती. अस्मानी संकटात ती सगळी पीके उध्वस्त झालेली, उघड्या डोळ्यानी पाहिली आहेत. सरकार, प्रशासन दरवेळी काहीतरी उपाय योजना करते. कायमचा उपाय करण्याची वेळ आली आहे. गोरगरीब लोकांचा संसार उध्वस्त झालेले आपण किती दिवस पाहणार आहोत. असा थेट सवाल त्यांनी पूरग्रस्त नागरीकांना विचारला. गेवराई तालुक्यातील ३३ गावे बाधित आहेत. या गावातील शेती पाण्यात जाते. त्यावर ठोस उपाय सरकार काढणार आहे का नाही ? हा खरा प्रश्न आहे. आम्हाला तात्पुरती सोय नकोय, आमची हक्काची



घरे, दारे, शेती सोडून, दर चार पाच वर्षाला बाहेर पडून, आम्हाला सरकारी शाळेत आसरा घ्यावा लागतो. या पुढे आपण एकत्र येऊन, या समस्यांवर तोडगा काढला पाहिजे. तुम्ही, मी एकत्र येऊन लढू आणि आपले प्रश्न सरकार दरबारी मांडुत. त्या शिवाय आता माघार घ्यायची नाही. तुमचे दुःख ते माझे दुःख आहे. त्यामुळे,

मी, तुमच्या सोबत असल्याचे ही शेवटी बाळराजे पवार यांनी गावकऱ्यांशी बोलताना सांगितले. यावेळी गावचे सरपंच श्रीराम काळे युवराज कोकरे, अशोक काळे, अशोक धनोरे ,अशोक वलेकर, पांडुरंग काळे, कोंडीराम काळे , ज्ञानेश्वर काळे, रशीद सय्यद यांच्यासह सर्व गावकरी उपस्थित होते



## केज शहरातील पवनराजे इंग्लिश स्कूल मध्ये गरबा महोत्सव उत्साहात संपन्न

### चिमुकल्यांचा उत्स्फूर्त सहभाग

प्रतिनिधी @ केज

केज शहरातील पवनराजे इंग्लिश स्कूल केज येथे नवरात्र उत्सवा निमित्त गरबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात शाळेतील चिमुकल्यांनी रंगीबेरंगी पोशाख परिधान करून उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.नृत्याच्यातालावर गोल फिरताना विद्यार्थ्यांनी आनंदाचा वर्षाव केला.या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या गरब्याला पालकांनीही दाद दिली. विविध वयोगटातील मुलांनी सादर केलेल्या गरब्यामुळे शाळा प्रांगणात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.कार्यक्रमाचे नियोजन शाळेच्या शिक्षकांनी केले होते. पारंपरिक सणांचे महत्त्व मुलांना समजावे आणि सांस्कृतिक परंपरा जपण्याची प्रेरणा मिळावी हा या उपक्रमामागील हेतू असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## माजलगावात एस टी आरक्षणासाठी धनगर समाजाची मोटरसायकल रॅली आणि रस्ता रोको आंदोलन

प्रतिनिधी @ माजलगांव

धनगर समाजाच्या एस.टी. आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी या जिव्हाळ्याच्या मागणीसाठी मल्हार योद्धे दीपक भाऊ बोराडे यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाला १५ दिवस पूर्ण झाले आहेत. या आंदोलनाच्या समर्थनार्थ माजलगाव शहरात दि.१ ऑक्टोंबर बुधवार रोजी मोटारसायकल रॅली तसेच वसंतराव नाईक चौकात चक्काजाम रस्ता रोको आंदोलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

मोटारसायकल रॅलीची सुरुवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, केसापुरी कॅम्प येथून झाली. ही रॅली छत्रपती संभाजी महाराज चौक साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक मौलाना आझाद चौक मार्गे या मुख्य रस्त्यावरून वसंतराव नाईक चौक माजलगाव चौफाळा येथे पोहोचली. त्यानंतर चौफाळा येथेच सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने रस्ता रोको



आंदोलन करण्यात आले.

या वेळी समाज बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग घेत जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलनस्थळी सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने तुकाराम येवले,प्रा.प्रकाश गवते, विजय धायगुडे, रामभाऊ आबुज,अशोक डोणे, विलास नेमाने, विशाल देवकते,मुक्तीराम आबुज,याचे यथेचित भाषणे व मार्गदर्शन झाले. या प्रसंगी समाजातील सर्व घटकांनी एकजूट दर्शवली.यानंतर सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने महसूल प्रशासन व पोलीस प्रशासनाला रीतसर निवेदन देण्यात आले. आंदोलन शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले.

समारोप प्रसंगी सर्व उपस्थित बांधवांचे आभार व्यक्त करण्यात आले. तसेच शासनाने तातडीने धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत निर्णय न घेतल्यास पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला. ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालक कोळी व पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त केला

## सरसकट पंचनामे करा, कोणाच्याही नुकसानीची नोंद राहणार नाही याची काळजी घ्या - आ.नमिता मुंदडा

प्रतिनिधी @ केज

केज तालुक्यात सर्वच मंडळात अतिवृष्टीची नोंद झालेली असल्याने सरसकट पंचनामे करावेत.त्यातकोणताही कसुर करू नये.कारण आजच्या या नैसर्गिक आपत्तीत अडचणीत असलेल्या सर्वसामान्यां साठी आपणच देव आहात म्हणून कोणाचे ही नुकसान होणार नाही,याची काळजी घ्या.कारण आपली चुक एखाद्याचे आयुष्य सुधारू अथवा बिघाडू शकते.म्हणून मानवीय मदतीचा दृष्टिकोन तेवत ठेवा,अशा सूचना आ. नमिता मुंदडा यांनी अधिकारी वर्गास केल्या

केज तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या बाबत सर्व विभागाच्या कार्यालय प्रमुखांच्या नैसर्गिक आपत्ती आढावा बैठकीचे आयोजन आ. नमिता मुंदडा यांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालयात सोमवारी दि.२९ रोजी करण्यात आले होते.यावेळी आ.




मुंदडा या बोलत होत्या. यावेळी उप जिल्हाधिकारी दीपक वजाळे,तहसीलदार राकेश गिड्डे,जेष्ठ नेते नंदकिशोरजी मुंदडा, कृउबा चे उपसभापती डॉ.वासुदेव नेहरकर, भाजपा तालुकाध्यक्ष भगवान केदार,नेताजी शिंदे,सुनील गलांडे, वसंत केदार,व्यापारी महासंघाचे अध्यक्ष महादेव सूर्यवंशी, भाजयुमो चे तालुकाध्यक्ष राहुल गदळे,शरद इंगळे, प्रकाश जाडकर,खदिर खुरेशी यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलताना आ.मुंदडा म्हणाल्या की,केज तालुक्यात अनेक छोट्या मोठ्या तलावांचे नुकसान झाले असण्याची शक्यता लक्षात घेत त्यांचे सर्वेक्षण तिन्ही विभागा च्या कर्मचाऱ्यांनी एकत्रितरित्या दोनच दिवसात करावे.रस्ते, शाळा,पुल,विद्युत पोल आदींच्या नुकसानीचेही प्रत्यक्ष जाऊन माहिती घ्या.जमीन खरडून गेलेल्या क्षेत्राबरोबरच नदीशेजारी असलेल्या उसाच्या नुकसानीचेही पंचनामे करावेतअशाही सूचना त्यांनी यावेळी दिल्या.तसेच प्रत्येक विभागाने आपापल्या विभागाचे झालेल्या नुकसानीचे अहवाल विहित वेळेत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करा.हे अहवाल त्यांच्यापर्यंत पोहोचले आहेत की नाही याची देखील खातरजमा करा अशा सूचना त्यांनी दिल्या.अधिकाऱ्यांना वरिष्ठ स्तरावर काही अडचणी असतील,तर त्या कळवा त्यावर आपण लागेल ती मदत करू,असेही त्यांनी यावेळी सांगितले.तसेच या आव्हानात्मक परिस्थितीत तहसीलदार राकेश गिड्डे यांनी तळमळीने केलेल्या कामाचे आ. नमिता मुंदडा यांनी यावेळी कौतुकही केले.

तालुक्यात अतिवृष्टीने नुकसान होऊन हतबल झाल्याने आत्महत्या केल्याच्या तीन घटना घडल्या आहेत,पशुधना च्या नुकसानीच्या वीस घटना नोंद झाल्या आहेत.घरांच्या पडझडीच्या छत्तीस घटना घडल्या असून चाळीस विहिरींचे नुकसान झाले आहे. तर एकशे त्रेचाळीस घरात पुराचे पाणी जाऊन त्या कुटुंबाना तात्पुरते स्थलांतरित करण्यात येऊन प्रत्येक कुटुंबास पाच हजार रुपयांची मदत देण्यात आली.तर शेतजमीन पुराच्या पाण्याने खरडून गेल्याचे ५५७ शेतकऱ्यांनी नोंद केली आहे.तर शेतातील ठिबक,सोलार व पाईप यांच्याही नुकसानीचे पंचनामे करण्यात येत असल्याची माहिती तहसीलदार राकेश गिड्डे यांनी यावेळी दिली.

अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांचे जनावरे दगावली असून काहींच्या घरांचेनुकसान झाले आहे.अशा बाधित शेतकरी व नागरिकांना प्रातिनिधिक स्वरूपात मदत म्हणून धनादेशाचे वाटप आ.मुंदडा यांच्या हस्ते यानिमित्ताने करण्यात आले.या बैठकीस गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे,कृषी अधिकारी सागर पठाडे, तालुका आरोग्य अधिकारी गवळी,नगर पंचायत मुख्याधिकारी अजित ढोपे,उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ.दत्तात्रय केंद्रे व सर्वच विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

## बार्शी दहीवडकर शिवाचार्यांना तीन सुवर्णपदके नवीन विक्रम केला प्रस्थापित

वाराणसी : नांदेड (अशोक पडोळे/ स्वामी)

महाराष्ट्रातील बार्शी दहीवडकर मठाचे श्री ष.ब्र. गुरुसिद्ध मणिकंठ शिवाचार्य स्वामींना संपूर्णानंद संस्कृत विद्यापीठाच्या शक्तिविशिष्टाद्वैत वेदान्त आचार्य परीक्षेत विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळाला आहे. यामुळे संपूर्णानंद सुवर्णपदक, स्वामी माधवाचार्य सुवर्णपदक आणि अन्नदाप्रसाद मुखर्जी सुवर्णपदक मिळाल्याचे विद्यापीठाच्या कुलगुरू कार्यालयाने जाहीर केले आहे. या पदकांमुळे त्यांनी वीरशैव शिवाचार्य परंपरेत एक महत्त्वाची नोंद केली आहे.

दहिवडकर महाराज मूळचे तेलंगणा प्रांतातील बोधनच्या सातेनूर मठाचे श्री बसवेश्वरस्वामी आणि सरस्वती या दाम्पत्यांचे तिसरे सुपुत्र आहेत. श्रीशैल क्षेत्रातील वीरशैव गुरुकुलात श्री ष. ब्र. चंद्रशेखर शिवाचार्य स्वामींचे शिष्य म्हणून वेदाध्ययन केले. त्यात प्राविण्य



मिळवले. त्यानंतर आपल्या विद्यागुरूंच्या आदेशाने काशी क्षेत्री येऊन जगद्गुरूंची अनुमती घेऊन २०१३ साली श्री जगद्गुरू विश्वाराध्य गुरुकुलात प्रवेश घेतला. स्थानिक सांगवेद ब्रह्मविद्यालयात सलग १२ वर्षे शिक्षण घेऊन २०२५ मध्ये शक्तिविशिष्टाद्वैत वेदान्त आचार्य परीक्षेत विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवून तीन सुवर्णपदके प्राप्त केली.

पूर्वी महाराष्ट्रातील वेळापूर संस्थान मठाचे श्री ष. ब्र. मुक्तेश्वर शिवाचार्य स्वामींनी १९८९ मध्ये दोन सुवर्णपदके मिळवली होती. त्याचप्रमाणे १९९६ साली आजचे श्रीशैल जगद्गुरू चन्नसिद्धराम पंडिताराध्य शिवाचार्य स्वामींनी देखील याच शक्तिविशिष्टाद्वैत वेदान्त परीक्षेत दोन सुवर्णपदके मिळवली होती. २०२५ मध्ये श्री दहीवडकर स्वामींनी तीन सुवर्णपदके मिळवून मागील सर्व विक्रम मोडीत काढत नवा विक्रम रचला आहे. यामुळे श्री जगद्गुरू विश्वाराध्य गुरुकुलाला अधिक गौरव प्राप्त करून दिला आहे.

दि. ८-१०-२०२५ रोजी होणाऱ्या विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात ही सुवर्णपदके त्यांना प्रदान करण्यात येतील. त्यांच्या या यशाबद्दल श्री जगद्गुरू पंचपीठाधीशांनी अनंत मंगल आशीर्वाद दिले आहेत. अखिल भारतीय वीरशैव शिवाचार्य संस्था,अखिल वीरशैव लिंगायत जंगम अर्चक पुरोहित संस्था महाराष्ट्र व विश्वाराध्य गुरुकुलातील सर्व विद्यार्थी आणि काशी वीरशैव विद्वत्संघाचे सर्व पदाधिकारी यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

## विजया दशमी निमित्त आरकेएसव्हीएम शाळेत सीमोलंघन व रावण दहन समारोहाचे भव्य दिव्य आयोजन

धर्माबाद (अशोक पडोळे)

शहरातील ऐतिहासिक सीमोलंघन व शमीपत्र पूजन उत्सव यावर्षी आगल्या वेगल्या व संपूर्ण पारंपारिक पद्धतिने साजरा होणार आहे. अनेक वर्षांपासून हा उत्सव डी. वाय. एस. पी. ऑफिस लगत साईनगर परिसरात आयोजित केला जात होता. मात्र त्या परिसरात वाढलेली वस्ती, वाहतुकीची कोंडी व जागेची कमतरता यामुळे उत्सवाच्या आयोजनात अडचणी निर्माण होत होत्या. वाढत्या लोकवस्तीमुळे शहराच्या सीमा संकुचित होत असल्याने उत्सव सुरळीत पार पडावा, या उद्देशाने हा उत्सव आता सीमेलगत असलेल्या राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, धर्माबाद यांच्या प्रशस्त प्रांगणात घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सकल आर्य समाज धर्माबाद यांनी घेतला आहे. त्यांच्चे मार्गदर्शन आणि सहकार्यानेच या वर्षापासून उत्सवाचे नियोजन विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले आहे. या संदर्भात विद्यालयाने नगरपरिषद धर्माबादसह संबंधित यंत्रणांना अधिकृत पत्रव्यवहार करून कळविण्यात आलेले आहे.

दिनांक २ ऑक्टोबर २०२५ रोजी विद्यालयाच्या भव्य प्रांगणात आपटा व शमीपत्र वृक्षपूजन, शस्त्रपूजन, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागातून विविध सांस्कृतिक उपक्रम रंगणार असून पारंपरिक रावण दहन सोहळा या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरणार आहे. सीमोलंघन हा सण केवळ धार्मिक विधी नसून तो श्रद्धा, एकोपा आणि सद्भावना वृद्धिंगत करणारा सामाजिक उत्सव आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या अतिक्रमणामुळे भारतीय परंपरा लोप पावत असताना आपली संस्कृती जतन करण्यासाठी आणि तरुण पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचे विद्यालय प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

शाळेचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सुबोध काकाणी यांनी सांगितले की,

सीमोलंघन उत्सव विद्यालयात साजरा करण्याची संधी मिळणे ही आमच्यासाठी गौरवाची असून या निमित्ताने विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीचा प्रत्यक्ष अनुभव मिळेल, त्यांच्यात सामाजिक बांधिलकी, ऐक्य आणि परंपरेबद्दल आदराची भावना दृढ होईल. समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून प्रेरणादायी आणि सर्वसमावेशक वातावरण निर्मिती हा आमचा उद्देश आहे.

विद्यालय प्रशासन व काकाणी परिवारातर्फे सर्व धर्माबादकर नागरिकांना तसेच पालकांना आवाहन करण्यात येते की, आपल्या मुलाबाळांसह मोठ्या संख्येने या उत्सवाला उपस्थित राहावे आणि रावण दहन सोहळ्याचा आनंद घ्यावा असे आवाहन संयोजकतर्फे करण्यात आले आहे .

## केंद्रीय गृहमंत्री अमित शहा अहिल्यानगर जिल्ह्यात कोणत्या घडामोडी घडणार,काय करणार याकडे सर्वांच्यां लागल्या नजरा

प्रतिनिधी @ अहिल्यानगर

रविवार दि. ५ ऑक्टोबर रोजी केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शहा अहिल्यानगर जिल्ह्यात दुसऱ्यांदा येत आहेत. मागील दौऱ्या वेळी ही लोणी,शिर्डी परिसरातच आले होते.गेल्या काही दिवसांपासून अनेक समस्यांनी ग्रस्त असलेल्या जिल्हा वासियांना गृह तथा सहकार मंत्र्यांचा दौऱ्याचा काय लाभ होणार ?याची सध्या चर्चा सुरू झाली आहे . राज्यात व केंद्रात भारतीय जनता पक्ष पक्षाचे सरकार आहे . नगर जिल्ह्यातील शेतकरी,नागरिक, अनेक समस्यांनी ग्रासलेले असताना केंद्रीयमंत्री अहिल्या नगर जिल्ह्यात येत आहेत.एका बाजूला शिर्डी विमानतळाचे आधुनिकीकरण व २०२७ च्या कुंभमेळ्या च्या पार्श्वभूमीवर नियोजन होत असताना नगर - कोपरगाव राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६० ची पुरती वाट लागली आहे.यापूर्वीच एका केंद्रीय मंत्र्याने आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या असे असताना या महिन्यात जिल्ह्यात अतिवृष्टीने अतोनात नुकसान झाले आहे . त्यामुळे मोठ्या काळा नंतर दुसऱ्यांदा नगर जिल्ह्यात दौरा करणारे केंद्रीय मंत्री अमित शहा काय बोलणार अन काय पाहणार ?याकडे लागले आहे.दरम्यान, केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शहा रविवार दि.५ ऑक्टोबर २०२५ रोजी अहिल्यानगरच्या दौऱ्यावर येत असून, सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील आणि ग्रामीण विकासाचे अर्ध्वयू माजी केंद्रीय मंत्री पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आणि पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या विस्तारीत प्रकल्पाचे लोकार्पण त्यांच्या शुभहस्ते आणि मग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले असल्याची माहिती डॉ.विखे पाटील कारखान्याचे चेअरमन डॉ.सुजय विखे पाटील यांनी दिली.यासंदर्भात माहिती देताना डॉ.विखे पाटील म्हणाले की, केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा हे सहकाराच्या भूमीत लोणी येथे दुसऱ्यांदा येत असून,यापूर्वी सहकार मंत्रालयाची धूरा त्यांच्याकडे आल्या नंतर राज्यातीलपहिल्या सहकार परिषदेसाठी त्यांना निमंत्रीत करण्यात आले होते. लोणी येथील विविध कार्यक्रमांना त्यांना पुन्हा निमंत्रीत करण्यात आले असून,प्रवरा परिवाराची विनंती मान्य करुन त्यांनी दोन्ही कार्यक्रमांना येण्याचे मान्य केले आहे.या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,विधान परिषदेचे सभापती राम शिंदे,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उप मुख्यमंत्री अजितपवार, केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले, केंद्रीय सहकार राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ पर्यावरण तथा पशु संवर्धन विकास मंत्री पंकजा मुंडे, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांच्यासह अन्य मंत्री तसेच महायुती चेलोक प्रतिनिधी उपस्थित राहाणार आहेत.प्रवरानगर येथे दुपारी १२ वाजता अमित शहा यांचे आगमन होणार असून, कारखान्याच्या विस्तारीत प्रकल्पाचे उद्घाटन त्यांच्या उपस्थितीत संपन्न होईल.त्यानंतर सर्व मान्यवर लोणी गावात येवून पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील आणि माजी केंद्रीय मंत्री पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्या पुर्णाकृती पुतळयाचे अनावरण करतील.गावातीलच बाजारतळावर दुपारी १ वाजता सर्व मान्यवरांचे सभास्थळी आगमन होणार असून,यासभेस केंद्रीय मंत्री अमित शहा,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मान्यवर मार्गदर्शन करतील.केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या स्वागताची जय्यत तयारी प्रवरा परिवारा च्या वतीने सुरु करण्यात आली असून, लोणी गावातील बाजारतळावर भव्य सभामंडपही उभारण्यात आला आहे.

## सौ. डॉ.धनश्री गोरख मोरे (खामकर ) यांना पीएच. डी. प्रदान

प्रतिनिधी @ माजलगांव

छत्रपती संभाजी नगर येथील रहिवासी आणि सध्या मुंबई येथे ऋ न्यायाधीशऋ म्हणून कार्यरत असलेल्या सौ. डॉ.धनश्री गोरख मोरे (खामकर ) यांनी भारतातील महिला कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी कायदे- मराठवाडा विभागाच्या विशेष संदर्भात एक चिकित्सक अभ्यासऋ या विषयात सादर केलेल्या शोधप्रबंधास मान्यता देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर च्यावतीने दिनांक ११/०९? २०२५ रोजी पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी हा शोध प्रबंध मा. सौ. डॉ. अपर्णा कोतापल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली सादर



केला, या पीएच. डी. संशोधनासाठी माणिकचंद पहाडे महाविद्यालयाचे प्राचार्य मा. श्री माणिकराव सर, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, व कर्मचाऱ्यांनी तसेच सहकारी मित्रपरिवार यांची मोलाचे सहकार्य मिळाले. सौ डॉ.धनश्री गोरख मोरे यांना या यशाबद्दल खूप खूप अभिनंदन.

# आष्टी मतदारसंघातील सिंचन प्रकल्पांसाठी आ.सुरेश धस यांचा जलसंपदा मंत्र्यांकडे महत्त्वपूर्ण पाठपुरावा

## पूरग्रस्त प्रकल्पांसाठी तातडीची मान्यता

प्रतिनिधी @ आष्टी

आष्टी विधानसभा मतदारसंघातील सिंचनासंबंधी प्रकल्पांच्या कामांच्या प्रगतीसंबंधी ना. राधाकृष्ण विखे पाटील जलसंपदा मंत्री गोदावरी व कृष्णा खोरे मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत आमदार सुरेश धस यांनी मतदारसंघातील महत्वाकांक्षी आणि अत्यंत गरजेचे सिंचन प्रकल्प सविस्तरपणे सादर केले. आष्टी मतदारसंघ हा दुष्काळी भागात मोडतो आणि या भागातील सिंचन प्रकल्पांमध्ये उशीरामुळे शेतकऱ्यांना पाण्याच्या उपलब्धतेबाबत अडचणी येत आहेत. यामुळे आमदार सुरेश धस यांनी आष्टी, पाटोदा व शिरूर (कासार) तालुक्यांसाठी सिंचन प्रकल्प राबवण्याची आग्रही मागणी केली.

सांगवी संगमेश्वर, सांगवी नागापूर, खडकत १ आणि खडकत २ को. प. बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतरण करण्याबाबत प्रशासकीय मान्यता देण्यात आली. करंजी प्रकल्पातील अतिरिक्त पाणी पांढरी गावापासून जामगाव दत्त मंदिर पाणलोट क्षेत्रापर्यंत सोडण्यासाठी नवीन कॅनॉल निर्मितीसाठी सर्वेक्षण, सिना नदीपात्रातून लोणी गावाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये पाणी सोडण्यासाठी नवीन उपसा योजना,सिना धरणांमधून पिंपरी घुमरी साठवण तलावामध्ये पाणी सोडण्यासाठी उपसा योजना, खडकत को. प. बंधाऱ्याचे वाहून जाणारे पाणी खडकत साठवण तलावात सोडणे, सीना मध्यम प्रकल्पातील डावा कालव्याची दुरुस्ती,



अहिल्यानगर तालुक्यातील पारगाव तलावापर्यंत कॅनॉलची दुरुस्ती, आष्टी तालुक्यातील कांबळी, कडी व कडा मध्यम प्रकल्पांसाठी विशेष दुरुस्ती व वित्तीय तरतूद, पाटोदा तालुक्यातील सौताडा साठवण तलावातून पूल व रस्त्यांचे काम, लांभरवाडी साठवण तलावातील अतिरिक्त पाणी सोडणे, अंतापूर साठवण तलावासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र, महासांगवी प्रकल्पाची उंची वाढवणे, तसेच प्रकल्पांवरील कालव्याचे कॉंक्रीटीकरण व दुरुस्ती करणे.

शिरूर (का.) तालुक्यातील सिंदफना मध्यम प्रकल्पाची उंची वाढवणे व कालव्यांचे रूपांतरण, आनंदगाव पद्मावती देवी तलाव क्र. २ चे खोलीकरण व उंची वाढविणे, तसेच बेलपारा प्रकल्पाद्वारे अतिरिक्त पाणी शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करणे.विशेष म्हणजे, मतदारसंघात मागील पंधरा दिवसापासून झालेल्या ढगफुटी व अतिवृष्टीमुळे अनेक साठवण तलाव, मध्यम प्रकल्प व कालव्यांना नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी मंत्री महोदयांना तातडीने दुरुस्ती व रब्बी हंगामासाठी पाणी साठवण्याची विशेष आर्थिक तरतूद करण्याची विनंती केली. मंत्री महोदयांनी त्वरित सकारात्मक प्रतिसाद देऊन मान्यता दिली.

आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) या तिन्ही तालुक्यांमधील जलसंपदा, जलसंधारण प्रकल्प आणि जिल्हा परिषदेच्या मालकीतील अनेक केट वेअरच्या दरवाजे अतिवृष्टीमुळे वाहून गेले आहेत. १५ ऑक्टोबर नंतर या गेटांची पुनर्स्थापना सुरू करण्याची आवश्यकता असल्यामुळे तात्काळ ७ दिवसांच्या कालावधीत निविदा काढून नवीन गेट खरेदी करण्याची मागणी जलसंपदा मंत्री

राधाकृष्णजी विखे पाटील साहेब यांच्याकडे केली. मंत्री महोदयांनी देखील या मागणीला त्वरित सकारात्मक प्रतिसाद देऊन खरेदीस मान्यता दिली.

याचबरोबर, शिरूर (कासार) तालुक्यातील घाटशिळ पारगाव मध्यम प्रकल्पाचे तलाव किना नदीला आलेल्या पुरामुळे गंभीर नुकसान झाले आहे. या तलावाची की-वॉल पुढे वाढवून दोन्ही संरक्षण भिंती उभारणे, कॅनॉलची दुरुस्ती करणे आणि माळेगाव चखला गावापर्यंत पाणी उपलब्ध करून देण्याबाबत मागणी केली. यासंबंधीचे सविस्तर अंदाजपत्रक मागविण्यासाठी तात्काळ आदेश मंत्री महोदयांनी दिले आहेत. या बैठकीत मुद्द्यांवर विशेष चर्चा होऊन आष्टी, पाटोदा व शिरूर (कासार) तालुक्यांतील शेतकऱ्यांना सिंचनासंबंधी गंभीर अडचणी दूर होण्याची आशा निर्माण झाली

# भगवान भक्तीगड येथील दसऱ्या मेळाव्यास लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा

प्रतिनिधी @ वडवणी



लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांनी स्थापन केलेल्या दसरा मेळाव्याला आता विराट स्वरुप झाले आहे, समाज बांधव या दिवसाची आतुरतेने वाट पाहत असतो, भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष संजय भाऊ आंधळे यांनी मागच्या आठ दिवसापासून संपूर्ण बीड जिल्ह्या सह वडवणी तालुका पिंजून काढत समाज बांधवांना भगवान भक्ती गडावर उपस्थित राहण्याची आव्हान केले,ओला दुष्काळ सदृश्य परिस्थिती आहे ,शेतकरी मेटाकुटीला आले आहे, अशा परिस्थितीतही ना. पंकजाताई मुंडे यांचे विचार ऐकण्यासाठी , भाजपाचे ध्येयधोरण समजावून घेण्यासाठी समाजा लाखोच्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचा विश्वास ठिकठिकाणी जनतेने दिला आहे,तरी वडवणी तालुक्यातील जास्तीत जास्त समाज बांधवांनी उपस्थित रहावे असे आव्हान भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय भाऊ आंधळे यांनी केले आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की, राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी व नामदार पंकजाताई मुंडे यांचे विचार ऐकण्यासाठी दरवर्षीभगवान भक्ती गड येथे होणाऱ्या दसरा मेळाव्यास पूर्ण महाराष्ट्रातून लाखो समाज बांधव येतात , यावर्षीही ओला दुष्काळ सदृश्य परिस्थिती असतानाही नामदार ताईंचे विचार ऐकण्यासाठी गावागावातून मोठ्या संख्येने समाज बांधव येणार आहे. समाजामध्ये जनजागरी करत गत आठ दिवसापासून भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी गावागावात कॉर्नर बैठका घेऊन जनतेला भगवान भक्ती गडावर येण्याची आव्हान केले असून उद्या वडवणी भगवान भक्ती गड हा रस्ता ज्या मा असणार अशी आश्वासन समाज बांधवांनी दिले आहे.




# माजलगाव तालुक्यातील पुरग्रस्त गाव सुरूमगाव येथे मराठा सेवा संघाच्या वतीने जिवनावश्यक वस्तुंचे वाटप

प्रतिनिधी @ माजलगांव

अतिवृष्टी व महापुर अशा दुहेरी तडाख्यात सापडलेल्या माजलगाव तालुक्यातील सुरूमगाव येथे मराठा सेवा संघ जिल्हा बीड यांच्या वतीने जिवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करण्यात आला. सविस्तर वृत्तांत असा की, मागील आठवड्यात झालेल्या अतिवृष्टी व महापुरामुळे माजलगाव तालुक्यातील सुरूमगाव ह्य गावचा जनसंपर्क तुटला होता. सध्या महापुराचे पाणी ओसरत आहे परंतु येथील नागरीकांना वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यासाठी मराठा सेवा संघ बीड यांनी 'पुरग्रस्तांसाठी एक हात मदतीचा' या उपक्रमातुन जिवनावश्यक वस्तुंचे वाटप सुरूमगाव या ठिकाणी केले. यावेळी श्री अशोकराव ठाकरे - विभागीय अध्यक्ष, धनंजय शेंडगे - बीड जिल्हाध्यक्ष, राहुल वायकर - संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष, मधुकर शेळके - विभागीय सचिव, संतोष डोंगरे - वारकरी परिषद बीड जिल्हाध्यक्ष, किरण सावंत, मधुकर नवले, श्री. रामकृष्ण यादव - अध्यक्ष ग्रामपंचायत अधिकारी संघटना, आनंदकुमार सिरसट सचिव ग्रामपंचायत अधिकारी संघटना यांसह गावक-यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# आष्टीत नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान अंतर्गत मोफत नेत्रविकार निदान, उपचार व शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

## शिबिरामध्ये एकूण १६८ रुग्णांची नेत्र तपासणी

प्रतिनिधी @ आष्टी

महेश आयुर्वेद हॉस्पिटल, आष्टी येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, धर्मादाय उपआयुक्त कार्यालय बीड तसेच महेश आयुर्वेद कॉलेज व हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान या मोफत नेत्रविकार निदान, उपचार व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन आष्टी - पाटोदा - शिरूर कासार मतदारसंघाचे नेते, माजी आमदार मा. भीमरावजी धोंडे, राजेशजी अ. सासने साहेब (धर्मादाय सह आयुक्त लातूर विभाग, लातूर) प्रदीपजी म. चौधरी साहेब (धर्मादाय उप आयुक्त, बीड) यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रास्ताविकात नेत्रतज्ज्ञ डॉ. चंद्रकांत




गोसावी म्हणाले की, या अभियानाचा उद्देश ग्रामीण व सामान्य जनतेपर्यंत नेत्रविकारांवरील मोफत व दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचवणे हा आहे. आजारांचे वेळेवर निदान व योग्य उपचार झाल्यास अनेक रुग्णांना नवे जीवन मिळू शकते. महेश आयुर्वेद हॉस्पिटल हे तळागाळातील रुग्णांसाठी सदैव तत्पर असून, या उपक्रमातून समाजहितासाठी मोठी सेवा घडणार आहे.अध्यक्षीय भाषणात मा. आ. भीमरावजी धोंडे साहेब म्हणाले १७ सप्टेंबर २०२५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त या अभियानाची सुरुवात झाली असून, २ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंतीदिनी समारोप होणार आहे. ग्रामीण व तळागाळातील रुग्णांना मोफत नेत्रतपासणी, औषधे, शस्त्रक्रिया व चष्म्यांचे वाटप हा या अभियानाचा उद्देश आहे. पूरग्रस्त परिस्थिती असूनही जिल्ह्यात असे लोककल्याणकारी कार्यक्रम घेणे अभिमानास्पद आहे. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टीचा या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग उल्लेखनीय आहे. प्रत्येक आव्हानाचा मुकाबला करत समाजहिताचे अभियान राबवणे हीच खरी सेवा आहे. भविष्यात कॅन्सर हॉस्पिटलसारखी अधिक प्रगत सुविधा उभारण्याचा मानस असून त्याबाबत प्राथमिक चर्चा सुरू आहे. या उपक्रमासाठी घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे.

प्रमुख पाहुणे राजेश ससाने म्हणाले नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान हा समाजातील दुर्बल घटकांसाठी मोठा दिलासा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सुरू झालेले आणि गांधी जयंतीपर्यंत चालणारे हे अभियान हजारो रुग्णांना दृष्टीसंपन्न आयुष्य देणार आहे. महेश आयुर्वेद हॉस्पिटल ग्रामीण भागात आरोग्यसेवेचे भक्कम केंद्र म्हणून उभे राहत आहे. प्रा. शिवदास विधाते यांनी सांगितले हॉस्पिटलमध्ये नेत्रविकारांवरील सर्व सुविधा उपलब्ध असून गरजू रुग्णांना भविष्यातही मोफत किंवा अल्पदरात सेवा पुरवण्याचा आमचा संकल्प आहे. या शिबिरामध्ये एकूण १६८ रुग्णांची नेत्र तपासणी नेत्रतज्ज्ञ डॉ. गोसावी चंद्रकांत यांनी करून उपचार करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुण्यांमध्ये प्रदीपजी चौधरी, सुपकाळ, कुंभार, माजी जि. प. सदस्य रामराव खेडकर, आर. पी. आय तालुका अध्यक्ष अशोक साळवे, ग्रा. पं. सदस्य आदेश निमोनकर, इंजि. एम. एन. बडे, वैजनाथ मिसाळ, संतोष सानप, पत्रकार उत्तमराव बोडखे, प्रवीण पोकळे, शरद रेडेकर, प्रशासन अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, प्रा. शिवदास विधाते, माऊली बोडखे, संजय शेंडे, संदीप नन्नवरे, सागर वाघुले उपस्थित होते तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, हॉस्पिटलचे सर्व कर्मचारी, आनंद संकुलमधील सर्व प्राचार्य, रुग्ण व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नमो नेत्र संजीवनी स्वास्थ्य अभियानांतर्गत आष्टीत मोफत भव्य नेत्र तपासणी शिबिर

## आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नामुळे १५१८ रुग्णांना मिळाला लाभ

प्रतिनिधी @ आष्टी

आष्टी तालुक्यातील अनिषा ग्लोबल इंग्लिश स्कूल, जामगाव रोड येथे नमो नेत्र संजीवनी स्वास्थ्य अभियान अंतर्गत मोफत नेत्र विकार निदान, उपचार व शस्त्रक्रिया भव्य शिबिराचे आ. सुरेश धस यांच्या आयोजनात तर लातूरचे धर्मादाय सहआयुक्त राजेशजी सासने यांच्या हस्ते तर बीडचे धर्मादाय उप आयुक्त प्रदीप चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

शिबिरामध्ये नेत्र तपासणी, चष्म्याचा नंबर तपासणी तसेच मोतीबिंदू तपासणी यासह महत्त्वपूर्ण वैद्यकीय तपासण्या पार पडल्या. रुग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले आणि मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी आवश्यक मार्गदर्शन व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. या भव्य नेत्र तपासणी शिबिरात १५१८ रुग्णांनी लाभ घेतला असून आनंदऋषिजी नेत्रालय, अहिल्यानगर येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी संपूर्ण तपासणी शिबिरात आपले अमूल्य सहकार्य केले.



यावेळी बोलताना आ. धस म्हणाले, आपले यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी नमो नेत्र संजीवनी स्वास्थ्य अभियान ही योजना राबवून ग्रामीण व सर्वसामान्य रुग्णांच्या जीवनात खऱ्या अर्थाने उजेड निर्माण करण्याचे कार्य केले आहे. केंद्र सरकारच्या या उपक्रमाचा थेट लाभ आज हजारो रुग्णांना मोफत उपचार व शस्त्रक्रियेद्वारे होत असल्याचे प्रत्यक्ष अनुभवता आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गरीब रुग्णांप्रति संवेदनशील आहेत ते जमेल तसे मदत करतात. प्रधानमंत्री योजनेतून रुग्णांसाठी ३ ते ५ लाख रुपयांची मदत मिळते त्या योजना गरजू लोकांपर्यंत पोहचवण्याचं काम करू. काही जबाबदाऱ्या समाजाला देखिल घ्याव्या लागतात सगळ सरकार अवलंबून राहत येत नाही.

श्री मच्छिंद्र देवस्थानच्या वतीने १३ हॉस्पिटल आणि ३३ कोव्हिड सेंटर उघडले. त्या माध्यमातून अनेक रुग्ण वाचवले. आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील नुकसानग्रस्त नागरिकांना मदत करण्यासाठी विविध संस्था, दुग्ध संघ, आष्टी नगरपंचायत पदाधिकारी यांनी मिळून ५० लाख रुपये निधी गोळा केला आहे आणि ज्या लोकांना शक्य आहे त्यांनी लोकवर्गणीतून मदत करावी. उध्वस्त झालेला शेतकरी, गरीब लोक यांना प्रगतीपथावर आणण्यासाठी आपल्याला जमेल तशी मदत करावी लागेल.

यावेळी बोलताना लातूर धर्मादाय सहआयुक्त राजेश सासने म्हणाले की, महाराष्ट्र शासन, मुख्यमंत्री सचिवालय, मुख्यमंत्री सहाय्यता निधी,धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, धर्मादाय उप आयुक्त कार्यालय बीड तसेच श्री पिंपळेश्वर महादेव मंदिर देवस्थान, आष्टी या संस्थांनी संयुक्तरीत्या केलेले आयोजन अत्यंत कौतुकास्पद आहे. मी सर्व आयोजक संस्था, मान्यवर अधिकारी व वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांचे मनःपूर्वक आभार मानतो की त्यांच्या प्रयत्नांमुळे समाजातील गरजू रुग्णांना नवे जीवनदृष्टी लाभली असे शेवटी म्हणाले. या उपक्रमासाठी महाराष्ट्र शासन, मुख्यमंत्री सचिवालय, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, धर्मादाय उप आयुक्त कार्यालय बीड तसेच श्री पिंपळेश्वर महादेव मंदिर देवस्थान, आष्टी यांनी संयुक्तरीत्या सहकार्य केले.

# पूरग्रस्तांच्या पाठिशी शासन खंबीरपणे उभे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

टंचाईच्या सर्व सवलती मिळणार, जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्याला प्राधान्य

प्रतिनिधी @ मुंबई



राज्य शासन पूरग्रस्ताच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे. या भागातील शेतकरी, आपत्तीग्रस्त नागरिकांना टंचाई प्रमाणेच सर्व सवलती व उपाययोजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर दिली. आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांकडील कर्जाची वसुली थांबवावी, असे निर्देशही बँकाने दिल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, शेतकरी सध्या अडचणीत आहे. हे लक्षात घेऊन बँकांना वसुली थांबवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तसेच पूरग्रस्त कुटुंबांना गहू-तांदूळ, डाळी व आवश्यक वस्तूंचे कीट वितरित करण्यात येत आहे. विहीर खचणे, शेतजमीन खरडून जाणे, अशा केंद्र सरकारच्या निकषाबाहेर जाऊन, झालेल्या नुकसानीवरही राज्य सरकार स्वतंत्र मदत करणार आहे. नुकसानीचे पंचनामे दोन-तीन दिवसांत पूर्ण होऊन पुढील आठवड्यात केंद्राला प्रस्ताव पाठवला जाणार आहे. मात्र, केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य सरकारने स्वतःच्या निधीतून मदत सुरू केली असून नंतर केंद्राकडून ती रक्कम 'रिइम्बर्समेंट'च्या स्वरूपात मिळेल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत असली तरी आपत्ती व्यवस्थापन नियमावलीत ( मॅन्युअल) अशी व्याख्येचा समावेश नाही. असे असले तरी टंचाई निवारण काळातील निकषांप्रमाणेच सर्व सवलती व उपाययोजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करुन पूरग्रस्त आणि शेतकऱ्यांना तात्काळ भरघोस मदत आणि संपूर्ण कर्जमाफी करावी - संभाजी ब्रिगेड

प्रतिनिधी @ केज

बीड जिल्ह्यात मागील काही दिवसापासून शेतकरी अतिवृष्टीने त्रस्त झाला आहे.या आलेल्या महाभयंकर पुरामुळे सर्व ग्रामीण भाग व शेती आणि शेतकरी अडचणीत सापडून हवालदिल झाला आहे.त्यामुळे संभाजी ब्रिगेड बीड पूर्व च्या वतीने सत्ताधारी आमदार नमिता अक्षय मुंदडा यांच्या घरासमोर जागरण गोंधळ आंदोलन करून नंतर उपजिल्हाधिकारी यांना देखील निवेदन देऊन घोषणाबाजी करण्यात आली.तसेच सध्या जिल्ह्याच्या सर्वदूर भागात शेतकऱ्यांची पिके तर पूर्णपणे उध्वस्त झालेली आहेतच परंतु पुराच्या पाण्यामुळे शेत जमीन सुद्धा खरडून गेली आहे तसेच अनेक गावच्या गावे पुराखाली गेलेली असल्यामुळे कुटुंबच्या कुटुंब उध्वस्त झाले आहेत.तसेच,जनावरे आणि गुरेढोरे मोठ्या प्रमाणात मृत्युमुखी पडले आहेत.शेती सोबतच घरदार, संसाराला लागणारे सर्व साहित्य आणि मुलांच्या शैक्षणिक साहित्याचे या पुराच्या पाण्यात अतोनात नुकसान झाले आहे.हातामध्ये आलेले पीक पूर्णपणे वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांची जगण्याची उमेद कमजोर झाली आहे. चारही बाजूंनी तो भयानक संकटात सापडलेला असून येणाऱ्या काळात निराशा आणि नुकसानी मुळे आत्महत्या वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशावेळी शेतकरी आणि पूरग्रस्त लोकांना आधार देणे,त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य करणे त्यांच्या पाठीशी खंबीर पणे उभे



राहुन त्यांना धीर देणे हे महाराष्ट्राचे जागृत आणि संवेदन शील नागरिक म्हणून आपले सर्वांचे कर्तव्य आहे.त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तीला ज्या ज्या प्रकारचे सहकार्य या आपत्तीग्रस्तांना करता येईल तेप्रत्येकाने करावे.सर्व स्तरातील लोकांनी या अस्मानी संकटातून सावरण्या साठी शेतकऱ्यांना सर्वोतोपरी सहाय्य करावे.आमदार, नोकरदार,व्यापारी, उद्योगपती,समाजातील श्रीमंत वर्ग,सर्व शैक्षणिक संस्था,सर्व हिंदी-मराठी व इतर चित्रपट सृष्टी,टिव्ही चॅनल्स आणि सर्व धार्मिक स्थळे यासर्वांनी जेवढी जास्त मदत पैशाच्या,वस्तूंच्या,संसार उपयोगी साहित्याच्या स्वरूपात करता येईल ती केली पाहिजे. सरकारने त्यांच्या मानसिकतेचा गांभीर्याने विचार करून त्यांना या नैराश्येतून बाहेर काढण्यासाठी आपली तिजोरी खुली करावी. कोणतेही निकष न लावता व नियमांच्या चाकोरीत न अडकता जनतेला भरघोस मदत करावी.तसेच शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करून हेक्टरी एक लाख रूपये व गुराढोरांच्या बाजार किंमती प्रमाणे मदत करत त्यांना धीर द्यावा. सरकारने बाकीच्या लोकप्रिय योजनांवर काही काळ अंकुश लावून सध्याची प्राथमिकता ही फक्त आणि फक्त अतिवृष्टी आणि पुरामुळे संकटात सापडलेल्या लोकांना जास्तीतजास्त सहकार्य करणे आहे हे लक्षात घेऊन त्यांना मोठ्या प्रमाणात सहकार्य करावे आणि संकट ग्रस्तांच्या मदतीला धावून जाण्याची महाराष्ट्राची महान परंपरा कायम ठेवावी ही विनंती यावेळी उपस्थित रामकिसन मस्के सर,विभागीय सदस्य प्रवीण ठोंबरे सर,जिल्हाध्यक्ष शिवश्री राहुल खोडसे, अंबाजोगाई महिला आघाडी अध्यक्ष अश्विनीताई यादव, सतीश कुंडगर,नारायण मुळे,चौधरी उमेश, खोडसे विशाल, कमलाकर चव्हाण, ओमकार पतंगे, जोतिराम माने,पुष्कर रुपदास,अतुल गुजर, केराव टेहेरे,गजानन प्रताप अंबाड,हर्षवर्धन तरकसे,शिवाजी गुजर, मनोज गुजर इत्यादी आंदोलन कर्ते उपस्थित होते.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )


# ओल्या दुष्काळासाठी शेतकऱ्यांच्या लेकरांचा रस्ता रोको

## आमदार राजेश पवार यांना घेराव पक्ष विरहित आंदोलनात शासनाचा निषेध

प्रतिनिधी @ मुदखेड

नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यात अतिवृष्टीने खरीप तसेच बागायती पिके शेतकऱ्यांच्या हातचे गेले असून तोंडचा घास हिरावल्याने ओला दुष्काळ जाहीर करण्यासाठी शेतकऱ्यांच्या लेकरांनी दि. ३० मंगळवार रोजी रस्ता रोको केला असून पक्ष विरहित आंदोलनात शेतकऱ्यांच्या विरोधात घोषणाबाजी करत निषेध नोंदविण्यात आला आहे आमदार राजेश पवार यांना घेराव घालून जवाब विचारत धारेवर धरले असून दिवाळीच्या अगोदर सरकारी अनुदान मिळणार असल्याचे आश्वासन दिल्यानंतर शेतकऱ्यांच्या लेकरांचा राग शांत झाला आहे.

तर मुदखेड तालुक्यात शेतकऱ्यांच्या वतीने राष्ट्रीय महामार्गावर विजय देशमुख बारडकर, माधव पावडे, कृष्णकांत देशमुख, दीपक व्यवहारे, सतीश व्यवहारे यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको करण्यात आला आहे या आंदोलकांच्या वतीने शेतकऱ्यांच्या तीन मागण्या त्वरित पूर्ण करण्याचे निवेदन नायब तहसीलदार मारुती जगताप यांना देण्यात आले आहे.



ओला दुष्काळ जाहीर करा, हेक्टरी एक लाख रुपये अनुदान द्या, सरसकट शेतकऱ्यांची कर्जमाफी करा, शेतकऱ्यांच्या पिकांना हमीभाव द्या, या मागण्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या लेकरांच्या मागण्यांचा विचार न केल्यास यापुढे जनआंदोलन छेडण्याचा इशारा त्यावेळी देण्यात आला आहे.

या आंदोलनावेळी शेतकऱ्यांनी आपल्या शिवारातील सडलेले सोयाबीन आणून शासनाचे लक्षवेधण्यासाठी रास्ता रोको केला आहे यासोबतच सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली आहे शक्तिपीठ महामार्ग न करता शेतकऱ्यांना मदत केली तर जगाचा पोशिंदा शेतकरी जिवंत राहू शकेल अशी संतप्त प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आली आहे. रस्ता रोको दरम्यान नायगाव मतदारसंघाचे आमदार राजेश पवार या मार्गाने उमरी कडे जात असताना संतप्त शेतकऱ्यांच्या लेकरांनी त्यांची गाडी अडवून हिराव घालत धारेवर धरले होते यानंतर आमदार राजेश पवार यांनी दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना भरगोस मदत केली जाईल असे आश्वासन देऊन आंदोलनातून सुटका करून घेतली. यावेळी विजय देशमुख बारडकर, माधव पावडे, कृष्णकांत देशमुख, दीपक पाटील व्यवहारे, हनुमतराव राजेगोरे, बालाजी गाडे,विशाल पवार, प्रताप देशमुख बारडकर, भगवानराव पवार निवघेकर, दादाराव पुयड, प्रशांत पाटील, मनोज मनपूर्वे, जनार्दन शिंदे, महेश देशमुख, बालाजी मगरे, बालाजी आबादार, दत्तराव शिपरकर, पांडुरंग पाटील शिंदे, गणपत शिंदे, विश्वांभर पुय्यड यांच्या सह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाई अहलादसिंघ - भाई प्रहलादसिंघ शहीदी स्थान येथे दसरानिम्मित शहीदी लंगर



प्रतिनिधी @ नांदेड

१ ऑक्टोबर रोजी नगीनाघाट परिसरातील भाई अहलादसिंघ - भाई प्रहलादसिंघ या शहीदीस्थान येथे दसरा सणा निमित्त भव्य शहीदी लंगरचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजन समितिचे प्रमुख सरदार कुणालसिंघ नंबरदार यांनी दिली आहे.

शीख धर्मात दसरा सणाचे मोठे धार्मिक महत्व आहे. दसऱ्याच्या दहा दिवसांपूर्वी श्री दसम ग्रन्थ साहिब अन्तर्गत श्री चंडी साहेब पाठाचे आयोजन केले जातात. दहाव्या दिवशी अर्थातच दसऱ्याच्या दिवशी या पाठाचे समापन करण्यात येते. यंदा भाई अहलादसिंघ - भाई प्रहलादसिंघ या शहीदीस्थानावर व्यापक स्वरूपात पाठची समाप्ति व लंगर आयोजित करण्यात येत आहे. गुरुवारी दुपारी १२.३० पासून लंगर सेवेस प्रारंभ होईल. यावेळी लंगर प्रसाद ग्रहण करावा अशी विनंती कुणालसिंघ नंबरदार यांनी केली आहे.

# विद्यापीठाच्या सेंटर झोन बास्केटबॉल स्पर्धेत




## वसंतराव नाईक महाविद्यालय मुलीच्या संघाला सुवर्णपदक

प्रतिनिधी @ नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि यशवंत महाविद्यालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झालेल्या सेंटर झोन बास्केटबॉल स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक प्राप्त केले. बी. ए.द्वतीय वर्षाच्या कु. पल्लवी भालेराव, बी.ए.द्वितीय वर्षाची कु. साक्षी भालेराव, बी. कॉम तृतीय वर्षाची कु. प्रियंका पांचाळ तर बी.ए. प्रथम वर्षाची टीना रिंदकवाले या विद्यार्थिनींनी संतोष झोन बास्केटबॉल चमकदार कामगिरी केली. या यशाबद्दल श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोगी डॉ. नानासाहेब जाधव, कोषाध्यक्ष प्रा. ॲड. श्रीनिवास जाधव, प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार, उपप्राचार्य डॉ. व्ही.आर. राठोड यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ.शेखर घुंगरवार यांनी यथोचित सत्कार केला. या कार्यक्रमासाठी डॉ. व्यंकटेश देशमुख, डॉ. संतोष शिंदे, डॉ. साहेबराव शिंदे, से.नि. कार्यालयीन अधीक्षक आर. डी. राठोड यांसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती. या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील शारिरीक शिक्षण विभागप्रमुख व प्रभारी क्रीडा संचालक डॉ. साहेबराव मोरे आणि शारीरिक शिक्षण विभागाचे प्रा. डॉ. राहुल सरोदे यांनी मार्गदर्शन केले.

# २ लाख ९० हजार क्यूसेकच्या महापुरावर विष्णुपुरी प्रकल्पातून नियंत्रण ;पहिल्यांदाव १७ दरवाजे उघडले

प्रतिनिधी @ नांदेड

नांदेड शहराची तहान भागवण्यासाठी, तीन तालुक्यांतील दुष्काळावर मात करण्यासाठी आणि नांदेड एमआयडीसीच्या विकासासाठी स्व. शंकरराव चव्हाण यांच्या संकल्पनेतून विष्णुपुरी प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली. मागील पंचवीस वर्षांपासून गोदावरी नदीला एवढा मोठा पूर कधीच आला नव्हता. साधारणतः दरवर्षी एक लाख ते सव्वा लाख क्यूसेक एवढा पूर येत असे. परंतु यंदा प्रथमच तब्बल २लाख ९० हजार क्यूसेक एवढा प्रचंड महापूर आल्याने प्रशासनासमोर अभूतपूर्व आव्हान उभे राहिले होते. परंतु जिल्हा प्रशासनाच्या तत्पर कार्यवाहीमुळे व विष्णुपुरी प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी वेळेत केलेल्या विविध उपाययोजनांमुळे विष्णुपूरी प्रकल्पाच्या पूरपरिस्थतीवर नियंत्रण मिळविण्यास यश आले आहे.




### १७ दरवाजे प्रथमच पूर्णपणे उघडले

पूर्वी पूरनियंत्रणासाठी केवळ सव्वा लाख ते दीड लाख हजार क्यूसेक पाण्याचा विसर्ग करण्यासाठी काही दरवाजे उघडले जात असत. २००६ मध्ये सर्वाधिक १२ दरवाजे उघडण्यात आले होते. परंतु यंदा आलेल्या महापुरामुळे प्रथमच विष्णुपुरी प्रकल्पाचे १७ चे १७ दरवाजे पूर्णपणे उघडावे लागले. हे मोठे संकट समोर असताना प्रशासनाने वेळीच निर्णय घेतला आणि पुराचे पाणी सुरक्षितपणे सोडण्यात यश मिळवले.

### नादुरुस्तीत असलेले पाच दरवाजे मोठे आव्हान

प्रत्यक्षात प्रकल्पातील पाच दरवाजे मोठ्या नादुरुस्तीत होते. त्यामुळे एवढ्या महापुराच्या वेळी ते कार्यान्वित करणे हे पाटबंधारे विभागासमोर मोठे संकट होते मात्र अशा परिस्थितीत कार्यकारी अभियंता दत्तात्रय रा. सावंत, चारुदत्त बनसोडे, अशोक चव्हाण, नवनाथ पिसोटे (उपअभियंता) तसेच सहाय्यक अभियंता शिवम ससाने यांनी युद्धपातळीवर काम सुरू केले. रात्रंदिवस प्रयत्न करून, अवघ्या काही तासांत नादुरुस्त दरवाज्यांची दुरुस्ती करण्यात आली. परिणामी १७ पैकी एकही दरवाजा अडथळ्याविना कार्यान्वित करण्यात आला.

### शेतजमिनी पाण्याखाली जाण्यापासून वाचल्या

या निर्णायक आणि तातडीच्या कारवाईमुळे महापूराचे पाणी नियोजनबद्ध पद्धतीने सोडण्यात आले. त्यामुळे बॅकवॉटरची समस्या निर्माण झाली नाही. हजारो एकर शेती पाण्याखाली जाण्यापासून वाचली. अन्यथा गोदावरीच्या काठावरील अनेक गावे व शेती पूर्णपणे जलमय झाली असती.

### प्रशासन आणि जनतेकडून कौतुक

या यशस्वी पुरनियंत्रणामुळे मोठा अनर्थ टळला. नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ तसेच प्रशासनाने कार्यकारी अभियंता आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे विशेष कौतुक केले. विष्णुपुरी प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी दाखवलेली तत्परता आणि जबाबदारी कौतुकास्पद ठरली आहे. पंचवीस वर्षांनंतर आलेल्या एवढ्या प्रचंड महापुराच्या वेळी विष्णुपुरी प्रकल्पाची भूमिका अतिशय निर्णायक ठरली. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या धाडसामुळे व कौशल्यामुळे नांदेड जिल्हा एका मोठ्या आपत्तीपासून वाचला आहे.

# अतिवृष्टी मुळे सिडकोतील दसऱ्या निमित्त रावण दहन रद्द व पूरग्रस्तांना मदत करणार,आयोजक वैजनाथ देशमुख

प्रतिनिधी @ नांदेड

राज्यात संततधार पावसामुळे व अतिवृष्टी राज्यातील शेतकरी राजा व नदीकाठच्या व सखल भागातील हजारो नागरीकांच्या निवासस्थानी पाणी शिरल्याने गेल्या पंधरा वर्षांपासून सिडको हडको परिसरातील विजया दशमी दसरा निमित्ताने २ऑक्टोंबर २५ रोजी आयोजित रावण दहन कार्यक्रम स्थगित करण्यात आला असून शहरी व ग्रामीण भागातील बांधीत नागरीकांना व शेतकऱ्यांना दिवाळी पुर्वी अन्नदान किट वाटप करण्यात येणार असल्याची माहिती आयोजक तथा भाजपा महानगर उपाध्यक्ष वैजनाथ देशमुख यांनी दिली.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सिडको हडको भागात गेल्या पंधरा वर्षांपासून बिजली हनुमान मंदिर परिसरा लगत असलेल्या मौकळया जागेत पंचवीस फुट रावण दहन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते या सोहळ्याला माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण, खासदार अजितराव गोपछेडे,महानगर अध्यक्ष माजी आमदार अमरभाऊ राजूरकर, यांच्या सह भाजपा पदाधिकारी व सिडको परिसरातील लोकप्रतिनिधी प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता,



गेल्या पंधरा दिवसांपासून या कार्यक्रमासाठी युवा नेते संजय घोगरे, माजी नगरसेवक संजय इंगेवाड सिध्दार्थ गायकवाड,वाघाळा भाजपा मंडळ अध्यक्ष सचिन रावका, सतिश बस्वदे . राजु लांडगे ,मोनु जोशी व प्रमोद काळेवाड यांच्या सह अनेक कार्यकर्ते पदाधिकारी हे परिश्रम घेत होते, परंतु गेल्या आठ दिवसांपासून संततधार पावसामुळे व अतिवृष्टी झाली व राज्यातील अनेक जिल्ह्यात शेतकऱ्यांचा पिकांचे नुकसान व शेती बांधीत झाली तर शहरी भागातील अनेक भागात व सखल भागातील अनेक निवासस्थानी पाणीच पाणी झाल्याने जिवनाश्यक वस्तू सह संसार उपयोगी वस्तूचे नासधुस झाल्यामुळे दुःखाचे सावट पसरले आहे,या मुळे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण व नांदेड महानगर अध्यक्ष अमर राजूरकर यांनी केलेल्या सुचना मिळाल्याने हा कार्यक्रम रद्द करण्यात आला असुन दिवाळी पुर्वी सिडको हडको भाजपा पदाधिकारी यांच्या वतीने शहरी भागातील व ग्रामीण भागातील नागरिकांना व शेतकऱ्यांना दिवाळी पुर्वी अन्नदान किट वाटप करण्यात येणार असल्याचे आयोजक वैजनाथ देशमुख यांनी सांगितले असुन २ ऑक्टोबर विजया दशमी दसरा निमित्ताने रावण दहन कार्यक्रम स्थगित करण्यात आला आहे अशी माहीती देण्यात आली.



# विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांची तामसा येथे दुर्गा मंडळात आरती

प्रतिनिधी @ नांदेड

नांदेड परिक्षेत्र विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी माहूर येथे माता रेणुका देवी यांचे दर्शन घेऊन परत येताना तामसा मार्गे नांदेड जात असताना तामसा येथील शिक्षक कॉलनीतील जय जिजाऊ दुर्गा मंडळ येथे भेट दिली. जिजाऊ दुर्गा मंडळ तर्फे विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या हस्ते आरती करण्यात आली. व मंडळातर्फे शहाजी उमाप यांचे सत्कार करण्यात आला यावेळी मंडळाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापिका ललिता कदम, शिक्षिका सुरेखा माने,शुभांगी धरमुरे, सुजाता जाधव, सोनाली जाधव, सोनू वानखेडे सह कॉलनीतील दुर्गा मंडळ नी शहाजी उमाप यांचे आभार मानून नवरात्रीचा शुभेच्छा दिल्या.

# शेतकऱ्यांनी पाण्याने वाहिलेली शेती पाहूण शेतकरी राजा हवालदिल झाला मात्र मदत करण्यास सरकार रडतोय ...!

जिल्ह्याचे पालकतत्व घेतलेले पालकमंत्री कुठे ?

प्रतिनिधी @ नांदेड

महाराष्ट्र सह नांदेड जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी झालेल्या भागात अक्षरशः जमिनी पाण्याखाली गेल्या पाण्याने वाहिलेली जमीन पाहून शेतकरी रडले..! आता हळूहळू पाणी जसं विसर्ग कमी होऊ लागला तसे पाणी कमी होई लागले त्यातील फक्त माती दिसून शेतकरी रडतोय सरकार मदत करेल या अपेक्षेने बसलेल्या शेतकऱ्यांच्या अपेक्षाच कालच्या मंत्री मंडळातील बैठकीत नंतर शेतकऱ्याच्या मदतीच्या अपेक्षा वर मुख्यमंत्री एका शब्दात पाणी फिरले..!

जिल्ह्यात मागील काही दिवसांपूर्वी झालेल्या सतत पावसामुळे शेतीतील पिके मात्र मातीत होऊन बसले हे सरकारला दिसले नाही का? नांदेड जिल्ह्यातील नांदेड दक्षिण नांदेड उत्तर मुखेड देगलूर नायगाव धर्माबाद या सह अनेक तालुक्यातील शेतकऱ्यांना सतत पावसाच्या पहिल्या पूर्वीच एक मोठा झटका बसला होता जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी पाहणी केली होती मात्र त्या पाहणी दरम्यान सरकार आपल्या पाठीशी असल्याचे सांगितले होते तेव्हा सरकारकडून मदत भेटली या भागाला असे वाटत असताना नंतर झालेल्या सतत पावसामुळे जिल्ह्यावरही तसेच पूर परिस्थिती तशी अली संकटात अशा संकटात झुंज दिली

जिल्ह्यात सध्याच्य संदर्भात अशी परिस्थिती आहे अनेक गावांमध्ये आजही पाण्याचा पूर कायम आहे शेतात राहणाऱ्या नागरिकांची कुठलीही ची व्यवस्था नाही त्यामुळे तेथील विद्यार्थ्यांची शाळेला आजही



सुट्टीच आहे जाण्याने याचे रस्ते नाही गावाला कुठलीही सुविधा नाही नांदेड तालुक्यातील राहेगावात आजही बोटच्या माध्यमातून गावात प्रवेश करावा लागतो काल मंगळवारी नांदेड दक्षिण आमदार आनंदाराव तिडके बौढाकर या गावात धान्य किट दिली ही स्थानिक आमदार मात्र मतदार संघात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करून शेतकऱ्यांना मदत मिळेल ही अशा दाखवत काही आमदारांनी मुंबई गाठले आहे या सभेच्या परिस्थितीवरून शेतकऱ्यांना चांगली अपेक्षा होती की सरकार आपल्या पदरात चांगली मदत टाकेल यातून आपण बाहेर निघाल ही अपेक्षा शेतकऱ्यांच्या मनात होते परंतु झालेल्या काल मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर कुठलेही मदतीचे शब्द बाहेर निघाले नसल्याने प्रसार माध्यमावर सरकारमध्ये सरकारच्या विरोधात प्रचंड रोष निर्माण झाला आहे कालच नायगाव विधानसभेचे आमदार राजेश पवार यांची गाडी रोखून आंदोलकांनी शेतकऱ्यांना एकरी पन्नास हजार रुपये मदत मिळावी अशी मागणी केली होती दरम्यान आमदार पवार यांनी शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी सरकार कट्टीबद्धक असल्याचं सांगून तिथून मार्ग मोकळा करून घेतला होता शेतकऱ्यांनीही दिवाळीपूर्वी सरकारची मदत मिळण असल्यास सत्ताधारी आमदारांना जिल्ह्यात फिरू देणार नाही ही आक्रमक भूमिका घेतल्याने सरकारमधील मंत्रिमंडळांना चांगला धक्का बसला आहे सरकार आजचा उद्या मदतीसाठी काहीतरी भूमिका घेईल असे वाटत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्व झालेल्या कॅबिनेट बैठकीत कुठलीच सरकारला मदत मिळेल ही अपेक्षा राहिली नसल्याने येणाऱ्या काळात सरकारी विरोधात शेतकरी प्रचंड रोष व्यक्त करीत रहिल परंतु स्थानिक आमदारांना जिल्ह्यात फिरणं मुश्कील होईल हे ही तितकेच खरे आहे